नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.५**
**जुलै २०२१**

पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा सोमवार,दि.१९/७/२०२१ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता मा.महापौर, मा.पदाधिकारी व मा.पक्षनेते यांची पुणे महानगरपालिका भवन येथील कार्यालये तसेच प्रभागनिहाय क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती कार्यालये येथून दृक श्राव्य ( व्हिडीओ कॉन्फरन्सींग ) द्वारे भरेल.तसेच या कालावधीत मे.महाराष्ट्र शासन यांचे मा.मुख्यसभेस प्रत्यक्ष उपस्थितीबाबत आदेश आल्यास सदरची मासिक सभा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नियुक्त्या ''**

**विषय क्र.९२**

मा.श्री.शंकर गणपत पवार यांनी पुणे परिवहन महामंडळाकडे संचालक पदाचा राजीनामा सादर केला असल्याकारणाने शासन निर्णय क्र.पीएमसी–३००३/१४९०/प्र.क्र.१२४/०३ नवि–२२, दि.१९/४/२००७ च्या निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेच्या सदस्यामधून एका प्राधिकृत सदस्यांची निवड करणेबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे जा.क्र.पी.एम.पी.एम.एल. /सीएस ॲण्ड एलओ/२०,दि.१६/६/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.९३**

'' महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये तसेच मनपा सभा कामकाज नियमावलीतील नियम क्र. ६४ व ६८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नांव समितीवर १३ मा.सभासदांच्या महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे मनपातील पक्षांच्या किंवा गटाच्या संख्या बळाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देवून नियुक्ती करणे.''

**प्रश्नोत्तरे**

**महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.**

**स्थायी समितीचे ठराव**

**विषय क्र.९४**

संदर्भ :- १. मा. मुख्य सभा ठराव क्र. ३१२ दि. २६/०९/१९९७.
२. मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालयाकडीलप्राप्त अर्ज.
३. मा. विधी अधिकारी यांचा अभिप्राय जा.क्र. ४११ दि. ३०/०६/२०२०.
४. मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/माव्य/९२९ दि. १५/३/२०२१ चे पत्र.
५. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५,दि.५/४/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे सोलापूर रस्त्याच्या रुंदीकरणातील बाधित व्यावसायिकांना पुर्वी भाडयाने दिलेल्या गाळयांच्या हस्तांतरणाचे खालीलप्रमाणे धोरण ठरविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**धोरण ठरविणेचीआवश्यकता –**

१) पुनर्वसित गाळाधारक स्वतः व्यवसाय करण्यास सक्षम नसल्यास/मयत झाल्यास कुटुंबातील सदस्यांकडून करारनामा करता येणे अशक्य होते. गाळा वारसदाराचे नावे वर्ग झाल्यास नव्याने ३० वर्षे मुदतीचा करारनामा केल्यास भाडेकरार अटीतील अनियमितेस प्रतिबंध होईल. गाळ्याचा करारनामा नियमित झाल्यास भाडे वसुलीस अडचण येणार नाही.

२) पुनर्वसन केलेल्या गाळाधारकाने परस्पर दुसऱ्या व्यक्तीस गाळा चालविण्यास दिल्यास, गाळा भाड्याने दिल्याचे अगर विकत दिल्याचे सिद्ध करणेस अडचणी येणे. अशा बाबी निदर्शनास आल्या व त्यानुसार कारवाई प्रस्तावित केल्यास नाहक

कोर्ट कब्जे होतात. अशा परस्पर व्यवहारामध्ये महापालिकेने हस्तांतरासाठी तडजोड शुल्क आकारल्यास मनपाचे आर्थिक हितहोईल व नात्याने आर्थिक स्त्रोत निर्माण होईल.

३) पुणे सोलापूर रस्त्याच्या रूंदीकरणा मध्ये ३४६ गाळेधारकांचे मनपाची रिकामी जागा देवून पुनर्वसन करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या गाळेधारकांकडून जागा भाडेपोटी नियतकालीन उत्पन्न व थकबाकी तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| पेठ | गाळ्यांचीसंख्या | मासिक भाडे (रू.) | वार्षिक भाडे (रू.) | थकबाकी (रू.) |
|---|---|---|---|---|
| हडपसर | ३०९ | १,१६,३४५/- | १०,२२,७००/- | ५०,६२,०३३/- |
| वानवडी | ३७ | २०,७९४/- | २,४९,५२८/- | ८,३३,१५७/- |
| **एकूण** | **३४६** | **१,३७,१३९/-** | **१२,७२,२२८/-** | **५८,९५,१९०/-** |

यापैकी किमान ४०% गाळेधारकांचे हस्तांतरण झाल्यास त्यापैकी १०० गाळेधारकांचे कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण गृहीत धरल्यास त्यांचेकडून प्रस्तावित हस्तांतरण शुल्कापोटी रू. २५ लक्ष व ५० गाळेधारकांची कुटुंबाबाहेरील व्यक्तीकडे हस्तांतरण गृहीत धरल्यास त्यांचेकडून प्रस्तावित हस्तांतरण शुल्कापोटी रू. १ कोटी असे सुरूवातीस अंदाजे रू. १.२५ कोटी उत्पन्न महापालिकेस मिळणे अपेक्षितआहे. तसेच धोरण निश्चित झाल्यास वेळोवेळी पुणे मनपास हस्तांतरणापोटी उत्पन्न मिळणार आहे. त्याचप्रमाणे हस्तांतरण करताना संबंधीत गाळेधारकाची संपूर्ण थकबाकी वसुलकरणेची अट ठेवल्यामुळे थकबाकीची संपुर्ण वसुली होवून गाळेधारक नियमानुकूल होण्यास मदत होईल.

**कायदेशीरतरतुद –**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ड –** जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमुल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८**

**भाग ८ मिळकत/मालमत्ता वाटपाच्या प्रमुख शर्ती –** (९) मध्ये महानगरपालिकेची एखादी मालमत्ता एखाद्या संस्थेस/व्यक्तीस भाडेकराराने वाटप करण्यात आली असेल अशी मालमत्ता संबंधीत संस्थेने/व्यक्तीने **मा.महापालिकाआयुक्त यांच्या मान्यते शिवाय** गहाण ठेवणे, विकणे, पोट भाडयाने अथवा अन्य रितीने अन्य संस्थेस/व्यक्तीस हस्तांतरीत करणे अनुज्ञेय राहणार नाही. म्हणजेच अशा बाबीस मा. महापालिका आयुक्त यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

**भाग ११ – महानगरपालिकेच्या मिळकतीचे हस्तांतरण –**

(२४) महानगरपालिकेच्या कोणत्याही मिळकती अथवा बांधीव गाळे ज्या संबंधीत संस्था/व्यक्ती यांना दिर्घ मुदतीचे भाडे कराराने विशिष्ट कारणासाठी देण्यात आले असतील अशा मिळकती संबंधीत संस्था/व्यक्ती महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय परस्पर पोट भाडयाने अन्य संस्था/व्यक्ती यांना देणे अनुज्ञेय होणार नाही.

(२५) वर उल्लेख केलेल्या मिळकतींची संबंधीत संस्था/व्यक्ती यांना आवश्यकता नसेल तर त्या महापालिकेस परत करणे आवश्यक असेल अथवा ज्या विशिष्ट हेतूच्या दृष्टीने अशा मिळकतीचे वाटप करण्यात आले असेल त्या हेतूबाबत पात्र असणाऱ्या संस्था/व्यक्ती यांना महापालिकेची पूर्वपरवानगी घेवून अशा मिळकती उर्वरीत करार कालावधीसाठी हस्तांतरीत करता येतील. मात्र अशा हस्तांतरणासाठी संबंधीत जागेचे मुल्य व पूर्वीच्या संस्था/व्यक्ती यांचेकडून आकारण्यात आलेले मुल्य यांचेतील फरकांचे निवासी वापरासाठी २५% व व्यापारी वापरासाठी ५०% हस्तांतरण फी आकारण्यात येईल. तसेच ज्या संस्थेस/व्यक्तीस संबंधीत मिळकत हस्तांतरीत करावयाची आहे अशा संस्था/व्यक्ती यासाठी मा. मुख्य सभेची मान्यता घेवून व पुन्हा त्यांचेबरोबर रितसर करारनामा करून घेवून आणि हस्तांतरण फी भरून घेवून असे हस्तांतरण करण्यात येईल.

**पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण व ग.व.नि. विभागातील प्रचलित कार्यपद्धती –**

**१) अतिक्रमण विभाग –** महापालिकासभा ठराव क्र. २५१ दि. २४/०८/२०१५ अन्वये अधिकृत फेरीवाल्यांनी त्यांचे परवाने परस्पर हस्तांतरण करून दिलेले नोंदणीकृत व्यवसायिकांकडून तडजोड हस्तांतरण शुल्काची आकारणी करणेस मान्यता देण्यात आली आहे.

| नोंद रजिस्टर मधील परवान्याचा प्रकार | पूर्वीची परवाना श्रेणी (सध्या व्यवसाय करीतअसलेल्या ठिकाणची श्रेणी) | वसुल करावयाचे हस्तांतरण तडजोड शुल्क रूपये |
|---|---|---|
| स्टॉल | १. विशेषश्रेणी (तुळशीबाग, सारसबाग, हाँगकाँगगल्ली व नवीनधोरणांतर्गत अ+ वर्गवारीतीलजागा इ. | २ लाख |
| | २.अ श्रेणी | १ लाख ५० हजार |
| | ३. ब श्रेणी | १ लाख |
| | ४. क श्रेणी | ५० हजार |

| | | |
|---|---|---|
| हातगाडी/बैठा/गटई (विशेष श्रेणीतील नमूद ठिकाणां वरील परवाने वगळून) | श्रेणीलागूनाही | २५ हजार |
| गुऱ्हाळशेड | श्रेणी लागू नाही | १ लाख |

**२) झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग (ग.व.नि.)** – गलिच्छ वस्ती नियंत्रण विभागाकडून झोपडीधारकांचे, निवासी व बिगर निवासी यांच्या हस्तांतरणाचे धोरण महाराष्ट्र शासन निर्णय क्र. झोपसृ-२०१०/प्र.क्र. १/झोपसृ-१, मंत्रालय मुंबई दि. ०२/०१/२०१२ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे. शासन निर्णयातील –

भाग अ मधील अ.क्र. २ – अर्हता दिनांका पूर्वीच्या अस्तित्वातील मुळ संरक्षण पात्र झोपडीतील सध्या वास्तव्य करणारा झोपडीधारक तेथे किमान १ वर्ष पूर्वीपासून वास्तव्य करीत असल्यास ती संरक्षण पात्र झोपडी त्याच्या नावे हस्तांतरीत करता येईल.

अ.क्र. ३ – संरक्षण पात्र झोपडीचे हस्तांतरण करून घेणाऱ्या व्यक्तीने त्याच्या नावावर किंवा पत्नी/पतीच्या नावे अथवा अज्ञान मुलाच्या नावे संबंधीत महानगरपालिका क्षेत्रात अन्य झोपडी किंवा घर मालकीतत्वावरनसल्याचेहमीपत्र भरूनदेणेआवश्यक राहील.

अ.क्र. ४ संरक्षणपात्र झोपडीचे हस्तांतरण करून घेणाऱ्या व्यक्तीस अथवा कुटुंबाच्या नावे केवळ एकाच झोपडीचे हस्तांतरण होवू शकते.

भाग ब – ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर या शहराकरीता संरक्षणपात्र झोपडया हस्तांतरीत करणेसाठी हस्तांतरण शुल्क निवासी प्रयोजना करीता वापरावयाच्या झोपडीकरीता रू. ४०,०००/- व अनिवासी संयुक्त वापरातील झोपडीकरीता रू. ६०,०००/- प्रमाणे हस्तांतरण शुल्क आकारणी करून हस्तांतरणास मान्यता देण्यात यावी.

भाग ब (८) – ज्या झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा फायदा मिळाला असेल अशा व्यक्तीला किंवा त्याच्या/तिच्या पत्नीला/पतीला अथवा अज्ञान मुलांना झोपडी विकतघेता येणार नाही अथवा हस्तांतरीत करून घेता येणार नाही.

भाग ब (९) – पूर्वीच्या विक्रीबाबत प्रत्येक टप्याचे हस्तांतरण शुल्क न आकारता केवळ सध्याच्या हस्तांतरण टप्यावरील हस्तांतरणाचे शुल्क आकारण्यात येईल. तसेच भविष्यात प्रत्येक हस्तांतरणाबाबत हस्तांतरण शुल्क आकारण्यात येईल.

**३) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाचा प्रस्ताव –**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ड, पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग ८ (९) व भाग ११ (२४) व (२५) यांना अधीन राहून रस्ता रूंदी बाधितांसाठी भाडयाने दिलेल्या गाळयांचे/जागांचे हस्तांतरणासाठी खालीलप्रमाणे हस्तांतरण प्रकार निहाय हस्तांतरण शुल्क आकारणी प्रस्तावित करीत आहोत.

| **अ.क्र.** | **पुनर्वसनप्रकार** | **हस्तांतरणप्रकार** | |
|---|---|---|---|
| | | **कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण शुल्क** | **कुटुंबा बाहेरील हस्तांतरण शुल्क** |
| १. | पर्यायी/अदला बदलीने दिलेलीजागा | २५,०००/- | १,००,०००/- |
| २. | भाड्याने दिलेलीजागा | ५०,०००/- | २,००,०००/- |

**शुल्क निर्धारणाबाबत कारण मिमांसा –**

**भाग ११ (२५) मध्ये** – हस्तांतरणासाठी संबंधीत जागेचे मुल्य व पूर्वीच्या संस्था/व्यक्ती यांचेकडून आकारण्यात आलेले मुल्य यांचेतील फरकांचे निवासी वापरासाठी २५% व व्यापारी वापरासाठी ५०% हस्तांतरण फी आकारण्यात येईल. तथापी अशी तरतूद असली तरी पुणे सोलापूर रस्ता रूंदीकरणामध्ये पुनर्वसन करून पर्यायीअथवा भाडयाने दिलेल्या गाळयांचा आकार सरासरी १०० चौ. फुटाच्या जवळपास आहे. त्यामुळे या क्षेत्राचे शिघ्रसिद्ध गणकानुसार येणारे मुल्यांकन अत्यंत अल्प येते.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. झोपसृ-२०१०/प्र.क्र. १/झोपसृ-१, मंत्रालय मुंबई दि. ०२/०१/२०१२ अन्वयेअनिवासी संयुक्तवापरातीलझोपडीकरीता रू. ६०,०००/- प्रमाणेहस्तांतरणशुल्क आकारणीकरूनहस्तांतरणास मान्यतादेण्यात यावी. असे आदेशआहेत व त्यानुसारपुणे महानगरपालिकेकडीलग.व.नि. विभागाकडून कार्यवाहीसुरू आहे.

अतिक्रमण विभागाकडीलस्टॉलच्याहस्तांतरणाच्यातरतुदीप्रमाणे – स्टॉलकरीता अ+ वर्गवारीतीलश्रेणीकरीताहस्तांतरण फी र.रू. २,००,०००/- इतकी आकारण्यात येतआहे.

त्यामुळेगाळा/जागाहस्तांतरणाचेशुल्क अतिक्रमण विभागाकडीलतरतुदीप्रमाणेचप्रस्तावितकेलेआहेत.

**हस्तांतरणासाठी पूर्वअट –**

१)हस्तांतरण मागणीपूर्वी संपूर्ण भाडे थकबाकी एकरकमी भरणे बंधनकारक राहील.

२) कुटुंबातल्या कुटुंबात हस्तांतरण करताना सर्व वारसदारांचे नोटराईज्ड संमतीपत्र (योग्य शुल्काच्या स्टॅम्प पेपरवर)

आवश्यक राहील.

३)कुटुंबातील बाहेरच्या व्यक्तीस हस्तांतरण करताना मुळ गाळाधारक व त्याच्या कुटुंबातील वारस यांचे नोटराईज्ड संमतीपत्र आवश्यक राहील.

४)नवीन गाळाधारक म्हणजेच ज्याच्या नावे गाळा हस्तांतरीत करावयाचा आहे तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. त्याचा पुरावा म्हणून आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड दाखल करणेआवश्यक राहील.

५) ज्या व्यक्तीच्या नावे पूर्वी गाळाअसेल त्या व्यक्तीला गाळाहस्तांतरीत केला जाणार नाही.

६) गाळयाचे परस्पर हस्तांतरण करता येणार नाही.

७)गाळयाचे वीजबील व इतर सर्व कर थकबाकी हस्तांतरणापूर्वी भरणे बंधनकारक राहील.

८)गाळा व्यतिरिक्त जादा जागेचा वापर करता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास पहिल्यावेळी रू. ५०००/- दुसऱ्यावेळी रू. १०,०००/- तिसऱ्यावेळी व त्या नंतरच्या प्रत्येक वेळी रू. १५,०००/- दंड आकारून थकबाकी प्रमाणे वसुली करण्यात येईल.

९) हस्तांतरण प्रकरणी विधी विभागाच्या अभिप्रायानुसार व मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील छाननीनुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**हस्तांतरणाचीप्रस्तावितकार्यपद्धती –**

१) हस्तांतरणाचा अर्ज दाखल झाल्यानंतर गाळेधारकांकडून थकबाकी नसल्याबाबतचाअहवाल उप अधिक्षक, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडून घेणेत येईल.

२) संपूर्ण प्रकरणी विधी विभागाचाअभिप्राय घेणे.

३) प्रस्ताव मेंटेनन्स सर्व्हेअर/कनिष्ठ अभिंयता यांचेकडून तयार करणे.

४) उप अभियंता, मालमत्ता व व्यवस्थापन यांनी तपासणी करून प्रस्ताव मान्यतेसाठी उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडे सादर करणे.

५) उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन यांच्या मान्यते नंतर नवीन गाळेधारका सोबत करावयाचा भाडेकरार विधी विभागाकडून तपासून घेणे.

६) नवीन गाळेधारकास मेंटेनन्स सर्व्हेअर/कनिष्ठ अभिंयता यांचेकडून ताबा देणे.

७) उप अधिक्षक, मालमत्ता व व्यवस्थापन यांचेकडे भाडे रजिस्टर नोंदीसाठी कळविणे.

८) नवीन गाळेधारका सोबत भाडेकरार करणे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जुलै २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३८, दि.२१/६/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.९५</u>

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घन.व्यव./२७ दि.२७/४/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८२, दि.४/५/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन-

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित "या अशासकिय संस्थेबरोबर एक महिन्यासाठी तात्पुरती करारवाढ **करणेकामी** खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी व शहरातील साफसफाई व स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने" स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित"या अशासकिय संस्थे बरोबरदि.१३/०५/२०२१पासून पुढील एक महिन्यासाठी तात्पुरती करारवाढ करणेकामी मान्यता मिळणेस.

२) स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ . बाबींसाठी एक महिन्यांच्या कालावधीसाठी र.रु.३२,६१,६०८=३३बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणेस .हा खर्च RE19A164 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षामध्ये खर्च करणेस.

३) दि.१३/०५/२०२१ पासून पुढील १ महिना कालावधीत ढकलगाडी दुरुस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रु.५० -/याप्रमाणे १ महिन्याकरीता र.रु.५० -/आदा करणेस .हा खर्च RE19A 125या

अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षांमध्ये २०२१-२०२२ खर्च करणेस.

४) कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार सुरक्षा प्रावरणे, ढकलगाड्या व बकेट देणेस .हा खर्च RE19A 116 या अर्थशिर्षकावर नवीन आर्थिक वर्षांमध्ये खर्च करणेस.

५) अ (वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे रु .७० -/दर महा इतके शुल्क प्रस्तावित सहकारी संस्थेमार्फत

नागरिकांकडून आकारण्यास.

ब (झोपडपट्टीमध्ये प्रति झोपडी र.रु.५० प्रति महिना झोपडपट्टी धारकाकडून आकारणेस व प्रत्येक कचरा वेचकास प्रति

झोपडी प्रति महिना र.रु.१० -/प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेस.

क (व्यावसायिकांकडून निर्माण होणा-या कच-याचे संकलन करणेसाठी दरमहा

र.रु.१४० -/इतके शुल्क आकारणेस.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी**

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जुलै २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११, दि.२१/६/२०२१ चा झाला आहे.)**

<u>विषय क्र.९६</u>

संदर्भ– १) मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३४०, दि.१/६/२०२१

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन–

गेले दीड वर्ष कोरोनाच्या या संसर्गजन्य महामारीला आपण सामोरे जात आहोत. या महामारीची पहिला लाट झाली दुसरी लाट देखील खूप भयानक असून त्यात पुणे शहरातील बाधित झालेल्या रूग्णांच्या संख्येचा एक दिवसाचा उच्चांक हा ७२०० इतका गाठला होता. परंतु पुणे शहराचे महापौर, स्थायी समिती अध्यक्ष,सभागृहनेते, आयुक्त, पदाधिकारी संपूर्ण आरोग्य कर्मचारी यांच्या योग्य व कार्यतत्पर नियोजनामुळे काल दिनांक २४ मे २०२१ रोजीची बाधित झालेली संख्या हि ५०० ते ६०० च्या आत आणण्यात यश आले आहे.

या महामारीच्या काळात पुणे मनपाच्या आरोग्य विभाग प्रमुख ते शेवटच्यास्तरातील कर्मचारी यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता आपला जीव धोक्यात घालून केलेल्या कामासाठी त्यांना त्यांच्या कामाची पोचपावती म्हणून व खासबाब म्हणून त्यांना वेतनवाढ देण्यात यावी.

या पूर्वी सन २००८ मध्ये पुणे शहरातील बालेवाडी येथे कॉमन वेल्थ गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा पुणे मनपाच्या सर्व व्यवस्थापन टीमने चांगली कामगिरी केल्याबद्दल त्यांना खासबाब वेतनवाढ देण्यात आली होती त्याच धर्तीवर आरोग्य विभाग प्रमुख ते शेवटच्या स्तरातील कर्मचारी यांना खासबाब म्हणून वेतनवाढ देण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.९७</u>

संदर्भ– १) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०

३) केंद्रिय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क

५) यापूर्वी सादर करण्यात आलेले निवदेन जा. क्र. मआ/परि.क्र.३/५३५ दि. ३०/१२/२०२०

६) मा. महापालिका आयुक्त मान्यता ठराव क्र. ६/५३५ दि. ११/१२/२०२०

७) मा. स्थायी समिती ठराव क्र. ९२६ दि. ०५/०१/२०२१

८) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/५१ दि.४/५/२०२१ चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५८, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत धनकवडी सहकारनगर कार्यालयांचे अंतर्गत (१) श्रीशिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह तळजाई पायथा,पुणे. (२) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु.पुणे. (३) पुणे विद्यार्थीगृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर,पुणे. (४) गेणुजी बेलदरे मनपा शाळा, जांभुळवाडी रोड, पुणे. (५) अभिनव इंग्लिश स्कुल, स.नं.१३,कात्रज बायपासरोड, आंबेगाव बुद्रुक,पुणे–४६ येथे स्थापित करण्यात आलेल्या

आयसोलेशन/क्वारंटाईन/अवॅटेड केंद्र येथे दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन दुपारचा चहा,लहान मुलांसाठी दुध व बिस्कीट गरजेनुसार बिस्लरी पाणी बॉटल पुरविणे इत्यादी कामे, अवॅटेड सेंटर उभारणे करिता इमारती/रुम मधील सामान हलविणे, स्थापत्य विषयक कामे करणे व काही वस्तु (सन २०१९-२० च्या शेड्युल मान्य दराने आणि काहीवस्तु सरळ बाजारातुन रास्त दराने) खरेदी करुन पुरविणे इत्यादि कामी खालील बाबीस मान्यता देण्यात आलीअसून सदर बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभा यांचे निदर्शनास आणून द्यावी.

(१)बाब क्र. A (१) नुसार श्री शिवाजी मराठा वस्तीगृह येथे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ १ मध्ये दर्शविले प्रमाणे करुन घेतलेल्या स्थापत्य विषयक कामांचा एकुण खर्च रक्कम रु. ७,५७,१२२.७२/- अदा करणेस

(२)बाब क्र. A (२) नुसार मुक्तांगण इंग्लिश स्कुल येथे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ २ मध्ये दर्शविले प्रमाणे करुन घेतलेल्या स्थापत्य विषयक कामांचा एकुण खर्च रक्कम रु. २,३१,५०६.६२/- अदा करणेस

(३)बाब क्र. A (३) नुसार श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वस्तीगृह येथे ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ ३ मध्ये दर्शविले प्रमाणे करुन घेतलेल्या स्थापत्य विषयक कामांचा एकुण खर्च रक्कम रु.१९,६२८/- अदा करणेस

(४)बाब क्र. B नुसार अवॅटेड सेंटर तयार करताना आवश्यक साहित्य ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून बाब क्र. B मधील १ ते ४ मध्ये दर्शविलेप्रमाणे खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा एकुण खर्च रक्कम रु. १७,०३,००३.७०/- अदा करणेस

(५)बाब क्र. C (१) नुसार अवॅटेड सेंटर येथे दुपारचा चहा, बिस्कीट व पिण्याचे पाणी बिसलेरी १ लि. व जार २० लि. व दुध ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ ८ मध्ये दर्शविले प्रमाणे पुरविण्यासाठी झालेला एकुण खर्च रक्कम रु. २,१९,६६५.६०/- अदा करणेस

(६)बाब क्र. C (२) नुसार अवॅटेड सेंटर येथे दुपारचा चहा, बिस्कीट व पिण्याचे पाणी बिसलेरी १ लि. व जार २० लि. व दुध ठेकेदार मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून परिशिष्ठ ९ मध्ये दर्शविले प्रमाणे पुरविण्यासाठी झालेला एकुण खर्च रक्कम रु. ५,३१,६२९.९६/- अदा करणेस

(७)बाब क्र. D नुसार अवॅटेड सेंटर येथे दैनंदिन साफ सफाई ठेकेदार मे. शारदा सव्हिर्सेस यांचेमार्फत बाब क्र. D मधील अ.क्र.१ ते ३ दर्शविलेप्रमाणे एकुण खर्च रक्कम रु. २१,२२,६४३.५९/- अदा करणेस

(८)बाब क्र. E (१) श्री शिवाजी मराठा संस्थेचे मुलांचे वसतीगृह, तळजाई पायथा, पुणे. येथे सेंटर उभारण्याकरीता दि.२०/०४/२०२० ते दि.१४/०९/२०२० पर्यंत ठेकेदार मे. कृष्णा कंन्स्ट्रकशन यांचेकडून परिशिष्ठ १३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करुन घेण्यात आलेल्या कामांचा एकुण खर्च रक्कम रु. २१,२२,६४३.५९/- अदा करणेस

(९)बाब क्र.E (२) पुणे विद्यार्थीगृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कुल, अरण्येश्वर, पुणे. येथे सेंटर उभारण्याकरीता दि.०९/०४/२०२० ते दि.१४/०८/२०२० पर्यंत ठेकेदार कृष्णा कंन्स्ट्रकशन यांचेकडून परिशिष्ठ १४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करुन घेण्यात आलेल्या कामांचा एकुण खर्च रक्कम रु. ११,०८,८७५.५८/- अदा करणेस

(१०) बाब क्र.E (३) श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह आंबेगाव बु.पुणे. येथे सेंटर उभारण्याकरीता दि.११/०५/२०२० ते दि.१३/०८/२०२० पर्यंत ठेकेदार मे. कृष्णा कंन्स्ट्रकशन यांचेकडून परिशिष्ठ १५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करुन घेण्यात आलेल्या कामांचा एकुण खर्च रक्कम रु. २,६०,०५०.८०/- अदा करणेस

(११) बाब क्र. F (१) धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कंटेन्मेंट झोन पत्रा पार्टिशन करुन सिल करणे हे काम मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांचेकडून दि.१६/०५/२०२० पासून दि.३१/१०/२०२० पर्यंत परिशिष्ठ १६ मध्ये दर्शविण्यात आल्यानुसार करुन घेण्यात आल्याने एकुण कामांचा खर्च रक्कम रु. ७९,२१,२४८.२३/- अदा करणेस

(१२) बाब क्र.G(1)धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कंटेन्मेंट झोन मध्ये दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०६/२०२० पर्यंत सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन साफसफाई मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यात आल्याने परिशिष्ठ १७ नुसार झालेल्या कामाचा एकुण खर्च र.रु. १६,८००/- आदा करणेस

(१३) बाब क्र. G (२) धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोविड-१९ चे संक्रमण थांबविण्या करीता नागरिकांमध्ये जनजागृती करीता ठेकेदार मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन यांनी दि. ०९/०४/२०२० पासून दि. ३१/१०/२०२० पर्यंत परिशिष्ठ-१८ मध्ये दर्शविल्यानुसार पुरविलेल्या बोर्ड/बॅनर यांचा एकुण खर्च र. रु. २,००,१४६.८८ आदा करणेस.ठेकेदार मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन यांनी दि. १५/०७/२०२० पासून दि. १५/०९/२०२० पर्यंत परिशिष्ठ-१९ मध्ये दर्शविल्यानुसार पुरविलेल्या **माईक सिस्टीमसह ॲटो रिक्षांचा** खर्च र. रु. ३,४०,२००/- आदा करणेस.

**QRT ( Quick Resposible Team) करिता** ठेकेदार मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून दि. १५/०७/२०२०

पासून दि. ०९/०२/२०२१पर्यंत परिशिष्ठ-२० मध्ये दर्शविलानुसार भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या रिक्षांचा एकुण खर्च र.रु. १०,०३,८००/- ठेकेदारास आदा करणेस

(१४) वरील बाब क्र. १ ते १३ प्रमाणेझालेलाएकुणखर्चाचातपशीलखालीलप्रमाणेआहे.

| क्र | कामाचे स्वरुप | कामाचा कालावधी | ठेकेदाराचे नाव | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| A | स्थापत्य विषयक कामे | | | |
| १ | श्रीशिवाजी मराठा मुलांचे वसतीगृह (परिशिष्ट १ नुसार) | ०९/०४/२०२० ते १४/०९/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ७,५७,१२२.७२ |
| २ | मुक्तांगण इंग्लिश स्कुल (परिशिष्ट २ नुसार) | ०९/०५/२०२० ते १४/०८/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | २,३१,५०६.६२ |
| ३ | श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह (परिशिष्ट ३ नुसार) | १८/५/२०२० ते २०/६/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | १९,६२८.०० |
| B | अवॅटेडसेंटर साठी आवश्यक साहित्य खरेदी करणे (परिशिष्ट ४ ते ७ नुसार) | ०९/०४/२०२० ते १४/०९/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | १७,०२,९७३.७० |
| C | दुपारचा चहा,बिस्कीट, दुध बिसलेरी व जार पुरविणे | | | |
| १ | मुक्तांगण इंग्लिश स्कुल (परिशिष्ट ८नुसार) | १२/०५/२०२० ते १३/०८/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | २,१९,६६५.६० |
| २ | श्री शिवाजी मराठा मुलांचे वसतीगृह (परिशिष्ट ९ नुसार) | २४/०४/२०२० ते १४/०९/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ५,३१,६३०.४० |
| D | अवॅटेडसेंटर येथे दैनंदिन साफसफाई करणे | | | |
| १ | श्री शिवाजी मराठा मुलांचे वसतीगृह (परिशिष्ट १० नुसार) | २३/०४/२०२० ते १०/०६/२०२० | मे.शारदा सर्व्हिसेस | ५,८७,३५०.०४ |
| २ | मुक्तांगण इंग्लिश स्कुल (परिशिष्ट ११ नुसार) | १२/०५/२०२० ते १५/०६/२०२० | मे.शारदा सर्व्हिसेस | ६,१२,६८०.५४ |
| ३ | श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह (परिशिष्ट १२ नुसार) | ११/०५/२०२० ते ३०/०७/२०२० | मे.शारदा सर्व्हिसेस | ९,३१,६१३.०१ |
| E | कोरोना अवॅटेडसेंटर उभारणीकरीता मनुष्यबळ पुरविणे | | | |
| १ | श्रीशिवाजी मराठा मुलांचे वसतीगृह (परिशिष्ट १३ नुसार) | २०/०४/२०२० ते १४/०९/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ११,८२,४६८.३४ |
| २ | मुक्तांगण इंग्लिश स्कुल (परिशिष्ट १४ नुसार) | ०९/०४/२०२० ते १४/०८/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ११,०८,८७५.५८ |
| ३ | श्रीमती लक्ष्मीबाई हजारे मुलींचे वसतीगृह (परिशिष्ट १५ नुसार) | ११/०५/२०२० ते १३/०८/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | २,६०,०५०.८१ |
| F | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कंटेन्मेंट झोन सिल करणे (परिशिष्ट १६ नुसार) | १६/०५/२०२० ते ३१/१०/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ७९,२१,२४८.२३ |
| G 1 | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कंटेन्मेंट झोन मधील सार्वजनिक शौचालयाची साफसफाई करणे (परिशिष्ट १७ नुसार) | ०१/०६/२०२० ते ३०/०६/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | १६,८००.०० |
| G 2 | जनजागृती करण्याकरीता बोर्ड/बॅनर बसण्याकरिता (परिशिष्ट १८ नुसार) | ९/०४/२०२० ते ३१/१०/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | २,००,१४६.८८ |
| | जनजागृती करीता माईक सिस्टीमसह ॲटोरिक्षा (परिशिष्ट १९ नुसार) | १५/०७/२०२० ते १५/०९/२०२० | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | ३,४०,२००.०० |
| | QRT ( Quick Resposible Team) करिता घेण्यात आलेल्या भाडे तत्वावरील रिक्षा (परिशिष्ट २० नुसार) | १५/०७/२०२० ते ०९/०२/२०२१ | मे. कृष्णा कंन्स्ट्रक्शन | १८,३६,४५०.०० |

| | |
|---|---|
| एकुण खर्च रक्कम रुपये | **१,८४,६०,४१०.४७** |

(१५) वरील बाब क्र. १ ते १४ या कामांचा खर्च खालील अर्थशिर्षकावर आदा करणेस
अर्थशिर्षक -सन-२०२०-२१ चे अंदाजपत्रक
१ मुख्य देखरेख वसुली वगैरे,थ आपत्तीव्यवस्थापन विभाग,
थ १ नैसर्गिक आपत्तीग्रस्त/ अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत.

RE11R101

(१६) उपरोक्त अ. क्र. १४ नुसार सर्व कामांसाठी झालेल्या एकुण रक्कम रुपये**१,८४,६०,४१०.४७/-** खर्चास तसेच ठेकेदारास प्रस्तुत कामापोटी उर्वरित रक्कम रुपये**१,१६,२१,२४३.६१**/- आदा करणेस

(१७) ठेकेदार मे.कृष्णा कंस्ट्रक्शन व मे.शारदा सर्व्हिसेस यांचेशी सुधारीत रक्कमेनुसार वाढीव/दुरुस्त करारनामा करुन घेणेस

तरी उपरोक्त अ. क्र.१४ मधील एकुण कामांचा खर्च रक्कम रुपये**१,८४,६०,४१०.४७** तसेच अ.क्र. १ ते १६ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार दि. ०९/०४/२०२० पासुन दि. ०९/०२/२०२१ पर्यंत करुन घेण्यात आल्याने सदर बाब मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचेकडे पश्चात माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्यात येतआहे.

<u>विषय क्र.९८</u>

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/१४७ दि.२७/५/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३५९, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आप्तकालीन परिस्थितीमध्ये वैकुंठ व कर्वेनगर स्मशानभुमी येथे कोविड बाधीत रूग्णांच्या मृतदेहाच्या अंत्यविधीसाठी वापरण्यात आलेल्या व्हाईट कोलपोटी र.रू.२५००.०० प्रति मृतदेह या दरानुसार दि.१६/०४/२०२१ ते दि.१८/०५/२०२१ पर्यंत ५८९ मृतदेहांचे अंत्यविधी मे.जे.पी.एन्टरप्रायझेस यांचेकडुन अति तातडीने र.रू.१४,७२,५००.०० पर्यंत कामे करून घेण्यास व त्यापोटी सदर कामाचे बिल अदा करणेस पश्चात मान्यता देण्यात आली असुन व सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निर्दशनास आणणेत येत आहे.

<u>विषय क्र.९९</u>

संदर्भ- १) आरोग्य कार्यालयाकडील निवेदन जावक क्रमांक १६५,दि.२०/४/२०२१
२) महापालिका आयुक्त कार्यालय जावक क्रमांक मआ/आरोग्य/२१,दि.२०/४/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १५४.दि.३०/४/२०२१
४) अँनेस्थेशीया असोसिएशन ग्रुप वर्कऑर्डर जावक क्रमांक एच.ओ.११६४,दि.२८/४/२०२१
५) ANAESHTHESIA ASSOCIATES CRITICARE SERVICES यांचे आ.क्र.१०५५,दि.१७/५/२०२१ रोजीचे पत्र.
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१४९ दि.२७/५/२०२१ चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६०, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

गणेश कला क्रिडा रंगमंचाच्या प्रदर्शन हॉल मध्ये पुणे मनपा व सकाळ रिफिल फंड संस्थेच्या संयुक्त विदयमाने अँनेस्थेशीया असोसिएशन ग्रुप या संस्थेस कोव्हिड १९ सेंटर चालविणेकरीता देण्याबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

1. गणेश कला क्रिडा रंगमंचाच्या प्रदर्शन हॉलमध्ये पुणे मनपा व सकाळ रिफिल फंड यांच्या संयुक्त विदयमाने १०० ऑक्सिजन बेडस व २० HDU बेडस असे एकुण १२० बेडसचे कोविड १९ सेंटर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३)(क)अन्वये अँनेस्थेशीया असोसिएशन ग्रुप यांचे नावांत ANAESHTHESIA ASSOCIATES CRITICARE SERVICES याप्रमाणे दुरूस्ती करून त्यांना चालविण्यास देणेस.

२. खालील तक्त्यात व उपरोक्त नमुद केलेल्या तपशीलाप्रमाणे सेवा व कामे करणेस.

| अ.क्र. | मागणीचा तपशील | पूर्तता करणारे संबंधित |
|---|---|---|
| १ | जनरल फिजिशियन व इंटेसिव्हिसिस्ट २४ तास | ANAESHTHESIA ASSOCIATES CRITICARE SERVICES |
| २ | हॉस्पिटल व्यवस्थापक २४ तास | |
| ३ | स्टाफ नर्स | |
| ४ | पेशंट केअरसाठी वार्ड मावशी, वार्ड बॉय | |

३. **ANAESHTHESIA ASSOCIATES CRITICARE SERVICES**या संस्थेस गणेश कला क्रिडा रंगमंचाच्या प्रदर्शन हॉलमध्ये कोविड १९ सेंटर चालविणेकरिता कोविड १९ रुग्णांचे सीओईपी जम्बो हॉस्पिटलच्या धर्तीवर ऑक्सिजन बेडस र.रू.१४०४=४८ प्रती बेड प्रतिदिन व HDU बेडस करिता र.रू.३८४३=८४ प्रतीबेड प्रतिदिन प्रमाणे पुणे मनपातर्फे अदा करणेस.

४. सदर कामा प्रित्यर्थ येणारा खर्च हा खालील अर्थशिर्षकामधून करणेस.

**बजेट हेड – महसुली कामासाठी –RE17F257**

**Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामासाठी (खर्च)**

विषय क्र.१००

संदर्भ- १) दि.२३/४/२०२१ रोजी झालेली मा.महापालिका आयुक्त, मा.महापौर, मा.सभागृहनेते यांनी केलेली जागा पाहणी व त्यामध्ये दिलेले निर्देश.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१५१ दि.२८/५/२०२१ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६१, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे पेठ बाणेर स.नं.३३, येथे एकूण २४ आ.सी.यू.बेड खरेदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे म.न.पा.कडे मे.इमरसन एक्सपोर्ट इंजिनिअरींग सेंटर या कंपनीने त्यांच्या सी.एस.आर. फंडातून जमा करण्यात आलेल्या रक्कम मधून आणि मे.आर.एस. एन्टप्रायजेस, पुणे यांच्याकडून र.रू.१४,५२,०००/- + १८% जी.एस.टी.इतकी रक्कम रूपये पर्यंत काम करून घेण्यात येत आहे.

सदर खर्चाची महिति मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

विषय क्र.१०१

संदर्भ- १) दि.२३/४/२०२१ रोजी झालेली मा.महापालिका आयुक्त, मा.महापौर, मा.सभागृहनेते यांनी केलेली जागा पाहणी व त्यामध्ये दिलेले निर्देश.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१५२ दि.२८/५/२०२१ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६२, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे पेठ बाणेर स.नं.३३, येथे एकूण १३० फॉऊलर बेड खरेदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे म.न.पा.कडे मे.इमरसन एक्सपोर्ट इंजिनिअरींग सेंटर या कंपनीने त्यांच्यासी.एस.आर. फंडातून जमा करण्यात आलेल्या रक्कम मधून आणि मे.वंकटेश्वर एन्टप्रायजेस, पुणे यांच्याकडून र.रू.१२,३५,०००/- + १८% जी.एस.टी.इतकी रक्कम रूपये पर्यंत काम करून घेण्यात येत आहे.

सदर खर्चाची महिति मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

विषय क्र.१०२

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५७ दि.३१/५/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३६५, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

मा.मुख्य सभा ठराव क्रमांक-३११ दिनांक-२८/०८/२०१९ चे संदर्भ क्रमांक-६ च्या उपसुचनेनुसार कार्यवाही करणेसाठी पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टवर पुणे महानगरपालिकेकडील खालील नमुद अधिकारी- ६ व पुणे महानगरपालिका - मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट मार्फत ठरविण्यात आलेला सभासद १ असे एकूण ७ सदस्यांचा समावेश ट्रस्ट मध्ये करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.शहरअभियंता,बांधकाम विभाग
२) मा.मुख्यलेखापाल,अंतर्गत व अर्थान्विक्षक विभाग.
३) मा.उपआयुक्त,मालमत्ता व प्रशासन विभाग.
४) मा.मुख्य विधी अधिकारी,विधी विभाग.
५) मा.अधिष्ठता,वैद्यकीय महाविद्यालय.
६) मा.वैद्यकीय अधिक्षक,वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय.

विषय क्र.१०३

संदर्भ- १) मा.मुख्य सभा ठराव क्र.२५५,दिनांक १८/०२/२०२१
२) मा.पृथ्वीराज सुतार व मा.विशाल धनवडे यांचे दि.२२/४/२०२१ रोजीचे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१७३,दिनांक २७/०४/२०२१
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/१७४ दि.1/6/2021 ने पाठविलेला अभिप्राय
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७४, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात मिळकतकरात सवलत मिळणेसाठी मुदतवाढ देण्यासाठी संदर्भ क्र.१ चे ठरावाचे अनुषंगाने सवलत देणेस खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील मिळकतकर बिलाच्या दरास मा.मुख्यसभा ठराव क्र.२५५ , दि.१८/०२/२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झाली असून सदर ठरावानुसार दि.३१/०५/२०२१ अखेर सवलतीच्या दराने मिळकत कर भरणेची मुदत दि.३०/०६/२०२१ अखेर पर्यंत वाढविणेस,

२) त्याच प्रमाणे चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीचा कर न भरल्यास दिनांक १ जुलै २१ पासून आकारण्यात येणारी शास्ती या वर्षापूर्तीच दिनांक ०१ ऑगस्ट २०२१ पासून आकारणेस,

३) रेडीओद्वारे व प्रसिद्धी माध्यमाद्वारे आवाहन करणेस व त्याप्रित्यर्थ होणारा खर्च खालील अर्थशिर्षाकामधून अदा करणेस,

याकामी सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातून
RE ११ जी १०३, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे
छ.कर आकारणी व कर संकलन कार्यालय ३.संकिर्ण
या अर्थशिर्षकावर पुरेशी तरतूद उपलब्ध आहे.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

विषय क्र.१०४

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१७६ दि.1/6/2021 चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७५, दि.१/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

बालेवाडी स.नं.२०,२१ बाणेर स.नं.१०९ येथे उभारण्यात आलेल्या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पिटल(डि.सी.एच.) महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम ६७(३)(क) अन्वये डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल यांना ३ महिने कालावधीकरीता चालविण्यास देणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करारनामा करणेस व सन२०२१-२२ RE17F259 कोव्हिड१९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठीमान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/- या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.१०५

संदर्भ- १) मा.महेश वाबळे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि.१/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३८०, दि.१/६/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे शहरामध्ये कोरोना महामारीमुळे अनेकांचे उदरनिर्वाहचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच संपूर्ण राज्यामध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आल्याने अनेकांचे व्यवसाय बंद होते. यामुळे अनेक नागरिकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले होते. याच अनुषंगाने पुणे मनपाच्या मालमत्ता करामध्ये देण्यात येणारी सवलत हि ३१.०५.2021 पर्यंत

लागू असून वरील परिस्थितीचा विचार करता ही मुदत पुढील १ महिन्याकरिता वाढविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.१०६</u>

संदर्भ– १) मा. मुख्य सभा ठराव क्र. ४१८ दिनांक १०/०८/२०१६

२) मा. अति. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची दि.३०/१२/२०१६ रोजीची प्रशासकीय मान्यता.

३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–२०१५/प्र.क्र. ११८/नवि–२० दि. २८ ऑक्टोबर, २०१५

४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साविवि/८७७,दि.८/३/२०२१ चे पत्र.

५) मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ११२ दि. २६/३/२०२१

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.४००, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येत आहेत. या योजना अंतर्गत मागासवर्गीय कल्याणकारी योजना, महिला बाल कल्याण योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना, दि.अं.यो.राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान इ. योजनांचा अंतर्भाव आहे.

मागासवर्गीय कल्याणकारी योजना व महिला बाल कल्याण योजना यासाठी शासन परिपत्रकानूसार अर्थसंकल्पा मध्ये आवश्यक खर्च वजा जाता दोन योजनेसाठी प्रत्येकी ५% निधी राखून ठेवला जातो व त्यामार्फत सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य, रोजगार विषयक उपक्रम राबविले जातात.

तसेच पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत सन २०१९–२०२० या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक:– दिव्यांग–२०१८/प्र.क्र.५२/१८/ नवि–२८, दि.१० मे, २०१८ नुसार केंद्र शासनाच्या नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act, 2016) मधील कलम ३७ (ब) मधील तरतुदींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकाक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमांतर्गत ५% निधी राखीव ठेवण्यात येत आहे.

मा. मुख्य सभा ठराव क्र. ४१८ दिनांक १०/०८/२०१६ अन्वये अपंग (निःसमर्थ) कल्याणकारी योजनेची पुनर्रचना करणेकरीता व धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मान्यता देणेत आलेली आहे. तसेच मा. अति. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. २ अन्वयेसदर ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार समाज विकास विभागामार्फत कार्यवाही करणेत येत आहे.

संदर्भ क्र. ३ नुसार अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ३% निधीनागरी भागातील अपंगांसाठी खर्च करण्याकरीता मार्गदर्शक सूचना प्रस्तूत केल्या आहेत.

सदर मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी व कार्यवाही करणेकरीता खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**खालील योजनांची नियम व अटी नुसार मान्यता प्राप्त झाल्यापासून अंमलबजावणी करणेस.**

**१) योजनेचेनाव :– दिव्यांग–दिव्यांग, दिव्यांग–अव्यंग व्यक्तींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य देणे.**

**योजनेचे स्वरूप :–** किमान ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा दिव्यांग नसलेल्या वधू किंवा वराने दिव्यांग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास किंवा दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास विवाहासाठी र. रू. ३०,०००/– एकदाच अर्थसहाय्य देण्यात येईल.

**अटी व नियम :–**

१. मुलगा/मुलगी (दोघांपैकी एकाच्या) कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा पुरावा – गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटोपास/झोपडी सेवाशुल्क पावती/भाडेकरारनामा किंवा आधारकार्ड (ज्यावर मनपा हद्दीतील पत्ता व दिनांक वर्ष नमूद केले असल्यास) इ. जोडावे.
२. जोडप्याचे विवाहपात्र वय असणे आवश्यक. वयाचा पुरावा म्हणून दोघांचे जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटल मधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र किंवा आधारकार्ड यापैकी एक आवश्यक.
३. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळालेले वार्षिक उत्पन्न रू. १ लाखाच्या आत असावे. मा. तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला जोडावा.
४. अर्जदाराचे आधारकार्ड व बँक पास बुक झेरॉक्स प्रतजोडणे आवश्यक आहे.
५. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाहअसावा.

६. विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा. विवाहनोंदणीप्रमाणत्र जोडणे आवश्यक. विवाहाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक.
७. अशा प्रकारच्या शासनाच्या अन्य योजनेचा लाभ घेतला नसावा.
८. मा. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचा दाखला तसेच शासन वेळोवेळी जे बदल सुचवतील त्याप्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.
९. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**२) योजनेचेनाव :– दिव्यांग व्यक्तींनी स्थापित केलेल्या कला पथकास वाद्य खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे.**

**योजनेचे स्वरूप :–** दिव्यांग व्यक्तीनी स्थापित केलेल्या कला पथकास र. रु. ५० हजार पर्यंत एकदाच अर्थसहाय्य देणे आहे .

**अटी व नियम :–**

१. अर्जदार कला पथक संस्था ही सार्वजनिक विश्वस्त निधी कायदा अथवा संस्थानोंदणी अधिनियम १९६० अथवा व्यावसायिक आस्थापना अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक राहील. सोबत नोंदणीप्रमाण पत्र जोडणे आवश्यक आहे.
२. कलापथका मध्ये किमान ५ सदस्य असणे आवश्यक. सदस्यांची यादीसोबत जोडणे आवश्यक आहे.
३. सदर योजनेचा लाभ घेणेकरीता कलापथकातील सदस्यांचे महापालिका हद्दीतील किमान ३ वर्षे वास्तव्य असावे तसेच ३ वर्षे वास्तव्य असल्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्सपावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटोपास/झोपडी सेवाशुल्क पावती/भाडेकरारनामा किंवा आधारकार्ड (ज्यावर मनपाहद्दीतील पत्ता व दिनांक वर्ष नमूद केले असल्यास) इ. जोडावे.
४. सदर अर्जदार कलापथकातील सदस्यांचे मा. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचा दाखला तसेच शासनवेळोवेळी जे बदल सुचवतील त्याप्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल. अर्जासोबतसादर करणे आवश्यक राहील.
५. सदर अर्जदार कलापथकातील एकूण सदस्यांपैकी ६० टक्के कलाकारांकडे वाद्यकामाचे मे. राज्य शासनाकडील पारंगत प्रमाणपत्र आवश्यक.
६. कलापथकाचे बँक खाते असणे आवश्यक.
७. वाद्य खरेदी करणेसाठी मूळ कोटेशन जोडणे आवश्यक. वाद्ये वापरता येतअसल्याची चाचणी घेणेत येईल.
८. साहित्य खरेदी केल्याची मूळपावती कार्यालयाकडे एका महिन्याच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.
९. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**३) योजनेचेनाव :– दिव्यांग व्यवसाय गटांनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या वृद्धी करिता अर्थ सहाय्य देणे.**

**योजनेचेस्वरूप :–**व्यवसाय वृद्धीहोणे करिता भांडवली खर्चासाठी रक्कम रु. २५ हजार पर्यंत अर्थसहाय्य देणेत येईल.

**अटी व नियमः–**

१. दिव्यांग बचत गटांतील ५ सदस्यांनी एकत्र येवून व्यवसाय गट स्थापन केला असणे आवश्यक.
२. व्यवसाय गटाने सुरु केलेल्या व्यवसायास एक वर्षे पुर्ण झाल्यानंतर व व्यवसाय गटाचा व्यवसाय समाधानकारक असेल तर व्यवसाय वृद्धी होणे करिता भांडवली खर्चासाठी रक्कम रू. २५ हजारपर्यंतअर्थसहाय्य देणेत येईल.
३. सदरचे अर्थसहाय्य व्यवसाय गटासाठी असेल. अर्थसहाय्य रक्कम वैयक्तीक लाभ म्हणून गटसदस्यांना घेता येणार नाही.
४. सदर निधीचा विनियोग, कच्च्या मालाची खरेदी, पणन, मशिनरी खरेदी करणे, पॅकेजींग इत्यादी व्यवसाय पुरकतेसाठी करता येईल.
५. मागील वर्षाचे व्यवसाय गटाच्या ताळेबंदाचे प्रतीजोडणे.
६. व्यवसाय गटपास बुकाचे पानाची झेरॉक्स जोडणे आवश्यक.
७. व्यवसाय गट सर्व सदस्यांचे आधारकार्ड व दिव्यांगत्वाचा दाखला जोडणे आवश्यक
८. व्यवसायाकरीता ज्या वस्तू वा साहित्य खरेदी करावयाचे आहेत्याची यादी किंमतीसह मूळ कोटेशन जोडावे व आवश्यक परवाने जोडणे आवश्यक.
९. व्यवसाय वृद्धीसाठीचे अर्थसहाय्य एकदाच देणेत येईल.
१०. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**४) योजनेचेनाव :– दृष्टीहीनांसोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणे.**

**योजनेचे स्वरूप :–** पुणेशहर हद्दीतील व पी.एम.पी.एम.एल. बस जिथपर्यंत जाईल तिथपर्यंत दृष्टीहीनांसोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणेत येईल.

**अटी व नियम :–**

१. रेशनिंग कार्डची स्वसाक्षांकित प्रत अपत्य पडताळणीकरीता जोडणे आवश्यक.
२. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत व पी.एम.पी.एम.एल. बस जिथपर्यंत जाईल तेथील हद्दीत दृष्टीहीनांसोबतच्या मदतनीसाचे किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा

टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटोपास/झोपडी सेवाशुल्क पावती/भाडेकरारनामा किंवा आधारकार्ड (ज्यावर मनपा हद्दीतील पत्ता व दिनांक वर्ष नमूद केले असल्यास) इ. जोडावे.

३. वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटल मधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र, आधारकार्ड यापैकी एक आवश्यक.
४. अर्जदाराचे आधारकार्ड झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
५. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.
६. मा. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचा दाखला तसेच शासन वेळोवेळी जे बदल सुचवतील त्याप्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.
७. दृष्टीहीनांमार्फत मदतनीसांकरीता स्वतंत्र अर्ज भरून घेण्यात येऊन मदतनीसांना पी.एम.पी.एम.एल. मार्फत मी कार्ड देण्यात येईल.
८. दृष्टीहीन व्यक्तीसोबत असेल तरच मदतनीसास प्रवास करता येईल.
९. अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**५) योजनेचेनाव :– दिव्यांग व्यक्तींना वार्षिक अर्थसहाय्य देणे.**

**योजनेचे स्वरूप :–**पुणे महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या हद्दीतील कार्यात्मक/क्रियात्मक दिव्यांगत्व (अंधत्व, अल्पदृष्टी, कर्णबधीर (बहिरेपण व कमीऐकू येणे), लोकोमोटर डिसअबिलिटी, ठेंगुपणा, इन्टेलेक्च्युअल डिसअबिलिटी, ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर, सेरेब्रल पाल्सी, मस्क्यूलर डिस्ट्रॉफी, दीर्घकालीन मज्जासंस्था विकार, विशिष्ट शैक्षणिक अपंगत्व, कुष्ठपिडीत, मल्टिपलस्केलेरोसिस, संभाषण व भाषाअपंगत्व, थॅलासेमिया, हिमोफिलीया, सिकल सेल डिसीज, कर्णबधीर–अंधत्व, यांसह विविध प्रकारचे अंधत्व, असिड हल्ला झालेली व्यक्ती, पार्किन्सन्स डिसीज) असलेल्या व्यक्तीस दरमहा रक्कम रू. २०००/– प्रमाणे वार्षिक रक्कम रू. २४,०००/– अर्थसहाय्य देणे.

**नियम व अटीः–**

१. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंगकार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपड्डी फोटोपास/झोपडी सेवाशुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.
२. वयाचा पुरावा म्हणून जन्मदाखला/ससून जनरल हॉस्पिटल मधील वयाचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, मतदान यादीतील नांव अथवा मतदान ओळखपत्र यापैकी एक आवश्यक)
३. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.
४. कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळालेले वार्षिक उत्पन्न रू. १ लाखाच्या आत असावे. मा. तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला जोडावा.
५. अर्जदाराचे आधारकार्ड झेरॉक्सप्रत जोडणे आवश्यक आहे.
६. मा. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार किमान ६०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचा दाखला तसेच शासनवेळोवेळी जे बदल सुचवतील त्याप्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.
७. सदरचे अर्थसहाय्य हे पात्र अर्जदार व्यक्तीस वार्षिक स्वरूपात देणेत येईल.
८. अशा प्रकारच्या शासनाच्या अन्य योजनेचा लाभ घेतला नसावा.
९. या योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबातील अन्य सदस्यांनी ४५ दिवसांचे आत पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मयत दाखला किंवा मृत्युवार्ता पत्र जोडून योजनेच्या लाभ बंद करणेसाठी अर्ज सादर करावा.
१०. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या अर्जदाराने हयात असल्याबाबतचा दाखला समाज विकास विभागाकडील समाजसेवक यांचेकडून खातरजमा करून हयातीचे दाखले दरवर्षी दि. १ ते ३१ जानेवारी पर्यंत समाज विकास विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील.
११. अटी व नियम यात बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्तअथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**१. मा. मुख्य सभा ठराव क्र.४१८ दि.१०/०८/२०१६ नुसार मान्यता मिळालेल्या परिशिष्ठ 'अ' मधील महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थ सहाय्य देणेही योजना खालीलप्रमाणे सुधारित करणेस.**

**योजनेचेनाव :– महापालिका क्षेत्रातील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य देणे.**

**योजनेचेकार्यक्षेत्र :–** पुणे महानगरपालिका हद्द

**योजनेचेस्वरूप :–** १) पुणे महानगरपालिका परिसरात वास्तव्य असलेल्या किमान १५ मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करण्याकरिता नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रति मतिमंद व्यक्तीकरिता दरमहा रक्कम रू. २०००/– प्रमाणे र. रू. २४,०००/– वार्षिक अर्थसहाय्य अदा करण्यात येईल.

२) अथवा महापालिका हद्दीतील वास्तव्य असणाऱ्या मतिमंद व्यक्तीच्या पालकास आपल्या पाल्याच पालन–पोषण करण्याकरिता दरमहा रक्कम रू.२०००/– प्रमाणे एकूण र. रू.२४,०००/– वार्षिक अर्थसहाय्य अदा करणेत येईल.

**नियम व अटी :–**

१. कुटुंबाच`पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंगकार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्सपावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपड्डी फोटोपास/झोपडी सेवाशुल्क पावती/भाडे करारनामा इ. जोडावे.

२. दिनांक १/५/२००१ नंतर जन्माला आलेल्या व हयात अपत्यांमुळे कुटुंबाच्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त झाल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही.

३. मा. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीनुसार ४०% किंवा त्यापेक्षा जास्त मानसिक अपंगत्व (निःसमर्थ) असल्याचा दाखला तसेच शासन वेळोवेळी जे बदल सुचवतील त्याप्रमाणात नियम व अटीत बदल करण्यात येईल.

४. सदर अर्जदार संस्थेने संस्थेमधील प्रवेश घेतलेल्या प्रत्येक मतिमंद व्यक्तीचा शासकीय रूग्णालयाकडील मतिमंदत्वाचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

५. सदर अर्जदार संस्थेने संस्थेमधील प्रवेश घेतलेल्या मतिमंद व्यक्तीची काळजी घेण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक सुविधा उदा. भोजन, वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

६. सदर संस्थेमधील प्रवेश घेतलेल्या मतिमंद व्यक्तींच्या बाबत तसेच संस्थेने नेमणूक केलेले मानसेवी कर्मचारी व इतर काही कायदेशीर प्रश्न उपस्थित झाल्यास त्याबाबत संबंधित संस्थेची त्या बाबतची संपूर्ण जबाबदारी राहील.

७. अर्जदार संस्थाही सार्वजनिक विश्वस्त निधीकायदा अथवा संस्थानोंदणी अधिनियम १९६० अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक राहील. तसेच पुणे हे सदर संस्थेचे कार्यक्षेत्र असणे आवश्यक राहील. शासनाकडून अनुदान प्राप्त असलेस पुणे महानगरपालिकेचे अनुदान देणेत येणार नाही.

८. सदर योजनेचा लाभ महापालिकाहद्दीतील मतिमंद व्यक्तींचा घरामध्ये सांभाळ करणाऱ्या पालकांनाही घेता येईल. त्या करिता पुणे महानगरपालिका हद्दीतील निवासाचा पुरावा व पाल्याचे मतिमंदत्वाचे प्रमाणपत्र पालकांनी सादर करणे आवश्यक राहील.

९. गत आर्थिक वर्षाचे संस्थेचे जमा खर्च ताळमेळ जोडावे लागेल.

१०. सदरचे अर्थसहाय्य हे पात्र अर्जदार व्यक्तीस वार्षिक स्वरूपात देणेत येईल.

११. अशा प्रकारच्या शासनाच्या अन्य योजनेचा लाभ घेतला नसावा.

१२. या योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या मतिमंद व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबातील अन्य सदस्यांनी ४५ दिवसांचे आत पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मयत दाखला किंवा मृत्युवार्तापत्र जोडून योजनेच्या लाभ बंद करणेसाठी अर्ज सादर करावा.

१३. सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या अर्जदाराने हयात असल्याबाबतचा दाखला समाज विकास विभागाकडील समाजसेवक यांचेकडून खातरजमा करून हयातीचे दाखले दरवर्षी दि. १ ते ३१ जानेवारी पर्यंत समाज विकास विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१४.अटी व नियम यांत बदल करण्याचा/अर्ज नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास राहील.

**३. सदर योजना राबविणेसाठी पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील ४ ड दिव्यांगकल्याणकारी योजना निधीFE14E101 (दिव्यांगकल्याणकारी योजना) या अर्थशिर्षकावरती दरवर्षी तरतूद करणेस व खर्च करणेस.**

**४. दिव्यांगांसाठी राबविणेत येणाऱ्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे, योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा. महापालिकाआयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस.**

<u>विषय क्र.१०७</u>

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/विदयुत/१८७ दि.७/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०३, दि.८/६/२०२१

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगान`कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आप्तकालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या नायडू हॉस्पीटल येथील कोव्हीड–१९ सेंटर येथे फायर फायटींग सिस्टीम बसविणे व इतर विद्युत विषयक कामे करणे हे काम मे.जे.व्ही.एस.इंजिनिअरिंग यांचेकडून पुर्वगणनपत्रक रक्कमेच्या ७% कमीदराने म्हणजेच र.रू.८,६६,१६८=५२ पर्यंत

कामे करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी आवश्यकतेनुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

विषय क्र.१०८

संदर्भ- १) मा.मुख्य अभियंता पाणीपुरवठा विभाग जा.क्र.४२७६,दि.०४/०१/२०२१
२) महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/tax /५८३,दि.११/०१/२०२१
३) मा.मुख्य सभा ठ.क्र.२५५,दि.१८/०२/२०२१
४) मा.मुख्य अभियंता पाणीपुरवठा विभाग जा.क्र.७६०,दि.१२/०५/२०२१
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टॅक्स/१८८ दि.७/६/२०२१ चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०४, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांपैकी शिवणे व संपूर्ण उत्तमनगर या गावांना सद्य स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा सुरू असून त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपट्टीची देयके येत असल्याने व पुणे महानगरपालिकेकडून मिळकतकरामध्ये पाणीपट्टी आकारणे उचित नसल्याने खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून मिळकतकर देयकामधील शिवणे व संपूर्ण उत्तमनगर या गावातील मिळकतकर देयक पाणीपट्टी रद्द करणेस.

२) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे शिवणे व संपूर्ण उत्तमनगर या गावातील मिळकतधारकांनी मिळकतकर पुणे महानगरपालिकेकडे जमा केला आहे. अशा मिळकतधारकांची सन २०२१-२२ मधील जमा केलेली पाणीपट्टी सन २०२२-२३ च्या मिळकतकर बिलामध्ये समायोजित करणेस.

३) मुख्य अभियंता,पाणीपुरवठा कार्यालय यांनी संदर्भ क्र.४ मध्ये नमूद केलेनुसार शिवणे व संपूर्ण उत्तमनगर या गावांतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपुरवठा योजना पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेनंतर व सदर गावांना पुणे महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा सुरू झालेबाबतचा मुख्य अभियंता,पाणी पुरवठा यांचा अभिप्राय प्राप्त झालेनंतर मिळकतकर देयकामध्ये पाणीपट्टी आकारणेस.

विषय क्र.१०९

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घन.व्यव./१८९ दि.७/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४०५, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित या अशासकिय संस्थेबरोबर दि.१३/०६/२०२१ पासून दोन महिन्यांसाठी तात्पुरती करारवाढ करणेकामी व मा.महापालिका सभेची मान्यता मिळेल या भरवश्यावर स्वच्छ संस्थेसमवेत दि.०१/०१/२०२१ पासून मुदतवाढ कालावधीच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय बाबींची पूर्तता करणेकरीता मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.११०

संदर्भ- १) महापालिका सभा ठ.क्र.५९४,दि.१९/११/२०१९
२)मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/प्रकल्प/२०० दि.८/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१४, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फन टाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.१३५ कोटी इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करणेकामी खालील बाबीस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फन टाईम थिएटर पर्यंत उड्डाणपूल बांधणे या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७२(ब) प्रमाणे र.रू.१३५ कोटी इतकी आर्थिक तरतूद करणेस.

२) सदर कामासाठी सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने तरतूद करणेस.

विषय क्र.१११

संदर्भ- १) मा.स्थायी समिती ठराव क्र.९४३ दि.०५/०१/२०२१ ची मान्यता.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/२०२ दि. ८/६/२०२१ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१५, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

घोरपडी - मोरवडा नाल्या जवळील चौकामध्ये संरक्षण विभागामार्फत 'नॅशनल वॉर मेमोरियल'चे नुतनीकरण व सुधारणा कामे करण्यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ८९ अन्वये संरक्षण विभागास तरतुद उपलब्ध करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. सदर कामासाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाच्या तक्त्यानुसार वर्गीकरण करणेस

| खाते | अंदाजपत्रकातील बाब | वर्ग करावयाची रक्कम | खाते | अंदाजपत्रकातील बाब | अधिक खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| भवन | सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक FE14D136 पुणे शहरात लाईट हाऊस प्रकल्प सुरु करणे, पान क्र. १३० | र.रु. ६०लक्ष | भवन | घोरपडी - मोरवडा नाल्याजवळील चौकामध्ये संरक्षण विभागामार्फत 'नॅशनलवॉर मेमोरियल'चे नुतनीकरण व सुधारणा कामे करणे | र.रु. ६०लक्ष |

२. घोरपडी - मोरवडा नाल्याजवळील चौकामध्ये संरक्षण विभागामार्फत 'नॅशनल वॉर मेमोरियल'चे नुतनीकरण करण्यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ८९ अंतर्गत संबंधीत ठेकेदारांना र.रू.२९,७८,८५३.०० लक्ष व सुधारणा कामे करणेसाठी रक्कम रूपये २९,८८,५९८.०० लक्ष असे एकुण र.रु. ५९,६७,४५१.००लक्ष खालील नमूद ठेकेदारांच्या नावे वरील अनुक्रमांक १ नुसार वर्गीकरणाने उपलब्ध होणा-या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पुणे मनपा तर्फे खर्च करणेस.

३. नॅशनल वॉर मेमोरियलची सुधारणा कामे वरील नमुद तरतुदीमधुन होणार असल्याने संरक्षण विभागाचे HQ M&G Sub Area सोबत थर्डपार्टी ऑपरेशन अंतर्गत करारनामा करणेस.

४. 'नॅशनल वॉर मेमोरियल'चे नुतनीकरण कामे करणारे ठेकेदार १) मे.रोशन एन्टरप्रायजेस र.रु.७,८६,८८९.००/-,

५. मे.रोशन एन्टरप्रायजेस र.रु. ११,९५,३८८.००/- ३) मे.सचिन एन्टरप्रायजेस र.रु. ९,९६,५७६.००/- असे एकूण र.रु. २९,७८,८५६.००/- यांना अदा करणेस.

६. 'नॅशनल वॉर मेमोरियल'चे सुधारणा कामे करणारे ठेकेदार १) मे.दिप अॅण्ड दिप एन्टरप्रायजेस र.रु. ६,२१,१८०.००/- २) मे.श्लोक एन्टरप्रायजेस र.रु. ११,४१,९३०.००/-, ३) मे.पिंन्टु आर्टिकल्स र.रु. १२,२५,४८८.००/- असे एकूण र.रु. २९,८८,५९८.००/-यांना अदा करणेस.

७. अनुक्रमांक १ ते ६ या बाबीस मा. स्थायी समिती मान्यता दिल्यानंतर मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर महापालिका आयुक्त यांचे स्तरावर करारनामा करणेस व संरक्षण विभागाने नेमून दिलेल्या ठेकेदारास देय रक्कम अदा करणेस.

<u>विषय क्र.११२</u>

संदर्भ- १) केमसीस प्रोसेस इंजिनिअरींग प्रा.लि.भोसरी यांचा १४.०५.२०२१ रोजीचा प्रस्ताव.
२) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/१०४,दि.१७.०५.२०२१
३) वर्कऑर्डर जा.क्र.शअजा/ज/२२०९,दि.१७.०५.२०२१
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/२०४ दि.८/६/२०२१ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१७, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महापालिकेच्या राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे ऑक्सिजन जनरेटिंग प्लॅन्ट नव्याने बसविणेसाठी केमसीस प्रोसेस इंजिनिअरीग प्रा.लि.भोसरी या कंपनीने रक्कम रुपये १,१४,९८,६५०/- +१३,७९,८३८/- (१२% जी.एस.टी.) अशी एकूण रक्कम रुपये १,२८,७८,४८८/- चा प्रस्तावास मा.महापालिका आयुक्त यांनी दि.१७.०५.२०२१रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबतची कार्यवाही करणेची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

विषय क्र.११३

संदर्भ– १) अथर्व हेल्थ टेक (आय ) प्रा.लि.मुंबई यांचा १४.०५.२०२१ रोजीचा प्रस्ताव
२) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/१०६,दि.१७.०५.२०२१
३) वर्कऑर्डर जा.क्र.२२०६,दि.१७.०५.२०२१
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/२०५ दि.८/६/२०२१ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१८, दि.८/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

**पुणे महापालिकेच्या राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा येथे ऑक्सिजन जनरेटिंग प्लॅन्ट बसविणेसाठी अथर्व हेल्थ टेक (आय ) प्रा.लि. मुंबई या कंपनीचे रक्कम रुपये १,३५,००,०००/- + १६,२०,०००/-(१२% जी.एस.टी.) अशी एकूण रक्कम रुपये १,५१,२०,०००/-चे प्रस्तावास मा.महापालिका आयुक्त यांनी दि.१७.०५.२०२१ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सदर बाबतची कार्यवाही** करणेची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

विषय क्र.११४

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./२०७ दि.९/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२८, दि.१५/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ बाणेर स.नं.३३, येथे एकूण ८ आ.सी.यू.बेड खरेदी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क नुसार पुणे म.न.पा.कडे मे.डॉनियल मेजरमेंट सोल्युशन कंपनी या कंपनीने त्यांच्या सी.एस.आर. फंडातून जमा करण्यात आलेल्या रक्कम मधूनआणि मे.आर.एस. एन्टरप्रायजेस, पुणे यांच्याकडून र.रू.४,८४,०००/– + १८% जी.एस.टी.इतकी रक्कम रूपये पर्यंत काम करून घेण्यात येत आहे. सदर खर्चाची माहिती मा.मुख्य सभेकडे सादर करणेत येत आहे.

विषय क्र.११५

संदर्भ– १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ क्रीडा/१११७, दि.१८/२/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३११ दि. १३/३/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२९, दि.१५/६/२०२१

विषय– पुणे कर्वेनगर स.नं.११/२ येथील जलतरणतलाव व व्यायामशाळा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्ष कालावधीकरिता चालविणेस देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे कर्वेनगर स.नं.११/२ येथील जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असताआलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक हरीश राजेंद्र जगताप कोथरूड, पुणे–२९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.६०,०००/– (र.रू. साठहजार फक्त) मनपाने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा ६००/– ने अधिक दरानेत्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.११६

संदर्भ– १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ क्रीडा/११०५, दि.१७/२/२०२० चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठराव क्र. ३१२ दि. १३/३/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३०, दि.१५/६/२०२१

विषय– पुणे पेठ वानवडी शिवरकर उदयानालगतच्या कै.बापूसाहेब केदारी जलतरण तलाव१ वर्ष कालावधीकरिता लिव्ह ॲण्डलायसन्स तत्वावर देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ वानवडी शिवरकर उदयानालगतच्या कै.बापूसाहेब केदारी जलतरणतलाव १ वर्ष कालावधीकरिता लिव्ह ॲण्डलायसेन्स तत्वावर देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या चार निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक मे.ग्रायफोन सिक्युरिटी ॲण्डसर्व्हिसेस पत्ता– स. नं.५७, आझादनगर, वानवडी, पुणे – ४११०४० यांनीदेऊ केलेली मासिक र.रू.१,२१,७१७/– (र.रू. एक लाख एकवीसहजार सातशे सतरा फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ३४,६५०/–( अक्षरी रक्कम रू. चौतीसहजार सहाशे पन्नास फक्त) पेक्षा रक्कम रूपये ८७,०६७/– (अक्षरी रक्कम रू. सत्याऐंशीहजार सदुसष्ट फक्त) ने अधिक दराने त्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.११७</u>

संदर्भ– १) महाराष्ट्र शासन,नगर विभाग,मंत्रालय,मुंबई,शासन निर्णय क्र. PMRDA –३३१५/प्र.क्र.६१/नवि–७, दि.०९/०२/२०१८

२) महाराष्ट्र शासन,नगर विभाग,मंत्रालय,मुंबई,शासन निर्णय क्र. PMRDA –३३१५/प्र.क्र.४९/नवि–७, दि.१८/०७/२०१८

३) भारत सरकार राजपत्र अधिसूचना दि.१८/०९/२०१८

४) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे मार्फत सवलतदार TRIL-UTPL &SPVG यांना दि.०३/१०/२०१८ रोजी दिलेले निविदा स्वीकृती पत्र (LOA )

५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. EG /शिहिंमेरे/प्र.क्र.२/४३५, दि.०८/१०/२०१८

६) मा.मुख्य सभा ठ.क्र.९२५,दि.१७/१२/२०१८

७) मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुमप्राविप्रा,पुणे यांचेकडील दि.०४/०२/२०२१ व दि.२४/०२/२०२१ रोजीची पत्रे.

८) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुख्य अभि.(प्रकल्प)/२०६ दि.८/६/२०२१ चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३२, दि.१५/६/२०२१

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे मेट्रो लाईन ३( हिंजवडी ते शिवाजीनगर ) या मेट्रो प्रकल्पाचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे मार्फत बांधकाम सुरु करणेबाबतचा यापूर्वी मा. मुख्य सभेने मान्य केलेला ठराव क्रमांक ९२५ दिनांक १७/१२/२०१८ मधील मुद्दा क्र. ३ मध्ये अंशत: बदल करून खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) प्रस्तावित स्थानके व मुख्य रस्त्यांना जोडणाऱ्या जिन्यांचे स्थान नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी परवानगी देणेस.

२) प्रस्तावित मेट्रो संरेखा सर्वसाधारण मार्गिका रुंदी जागा उपलब्धता अंतिम विकास आराखड्यातील रस्ता मध्य रेषेप्रमाणे जागा उपलब्ध करून देणेस.

३) मनपा हद्दीतील रस्त्याखालील जागा विना मोबदला, विना अडथळा उपलब्ध करून देणेस व स्टेशन्स जिन्यासाठी आवश्यक जागा मनपाच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून योग्य त्या मोबदल्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास रितसर मालकी हक्काने हस्तांतरित करणेस, तसेच या प्रकल्पासाठी पुणे मनपा हद्दीतील विकास योजना आराखड्यातील बाधीत होणाऱ्या क्षेत्रासाठी खाजगी जमिनीचे भूसंपादन आवश्यक तेथे एफस्वरुपात जागा ताब्यात येणार नाहीत .आर.डी.टी / .आय.एस.स्वरुपात आणि जेथे एफ .आर.डी.टी / .आय.एस. तेथे भूसंपादन कायद्यान्वये भूसंपादनासाठी येणारा खर्च पुणे महानगरपालिकेने करणेस, व पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्याव्यतिरिक्त (Non DP ) जागांचे भू संपादन पुणे महानगर विकास प्राधिकरण यांचेमार्फत करणेस.

४) पुणे महानगरपालिकेच्या अंतिम विकास आराखड्यातील प्रस्तावीत रस्ता रुंदीनुसार जागा उपलब्ध करून देणेस .

५) पुणे विदयापीठ चौकातील, एचच्या आखणीच्या ठिकाणी सुयोग्य नियोजन करून वाहतूक सुधारणा .आर.टी.एम.सी. .विषयक कामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने करणेस

६) या कामामुळे बाधित होणाऱ्या सेवा वाहिन्यांचे स्थलांतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने स्वखर्चाने व संबंधित विभागांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली करणेस .

७) मेट्रो ३ प्रकल्पामधून मेट्रो १ व २ प्रकल्पा पर्यंत वाहतूक संक्रमण व्यवस्था कामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खर्चाने करणेस.

८) सदरचा मेट्रो प्रकल्प पूर्ण करणेसाठी लगतच्या आवश्यक त्या परवानग्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वखर्चाने घेण्यास.

९) तांत्रिक निकषानुसार व आवश्यकतेनुसार हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यानच्या मेट्रो मार्गामध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यास तसेच मान्य विकास आराखड्यातील रस्त्याच्या आखणी व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार मेट्रो मार्गाची आखणी करणेस .

१०) प्रस्तावित मेट्रो ३ मार्गाच्या आखणी बाबत व टी.ओ.डी.( TOD ) धोरणाबाबत मे.शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करणेस.

<u>विषय क्र.११८</u>

संदर्भ- १) पुणे महानगरपालिका मिळकत / जागावाटप नियमावली दि.२१/०२/२००८.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१७३,दि.०१/०६/२०२१ चे पत्र.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४५ दि. १४/६/२०२१
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४३, दि.१५/६/२०२१

विषय- पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सदनिकांची त्यामधील प्रत्यक्ष राहणा-या पुर्नवसित नागरिकांना शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दर + मोकळया जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार विक्री करणेबाबतच्या प्रस्तावाबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -
१विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार, पुणे मनपाच्या मालकीच्या सदनिका या रस्तारूंदीकरण वा अन्य प्रकल्प बाधितांना भाडेतत्वावर देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. अशाप्रकारे पुणे मनपाच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत २१९९ सदनिका प्रकल्प बाधितांना वाटप करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

**<u>(अ) पुणे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या सदनिका</u>**

उपरोक्त नमूद तरतुदीनुसार विकसकांकडून पुणे महानगरपालिकेस आतापर्यंत एकूण २९२३ सदनिका प्राप्त झालेल्या आहेत. यापैकी २१९९ सदनिकांचे वाटप प्रकल्प बाधितांना, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील बाधितांना ट्रान्झिट कॅम्प म्हणून करण्यात आलेले आहेत. सध्या ७२४ सदनिका रिकाम्या असून यापैकी २९ सदनिका कात्रज कोंढवा रस्ता, ७२ गणेशखिंड रस्ता, ९५ चाळ विभाग, ४४५ मेट्रो विभागाकरीता, २८ कोथरूड क्षेत्रीय कार्यालय यांचेसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ५५ सदनिका विविध ठिकाणी रिक्त आहेत. एकूण सदनिकांचा तपशील मा.महापालिका आयुक्त यांच्या पत्रासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये जोडलेला आहे.

**<u>(ब) कायदेशीर तरतूद</u>**

**(१) पुणे महानगरपालिकेच्या सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| ECONOMICALLY WEAKER SECTION HOUSING ( EWS) FOR RETAINABLE LAND DECLARED UNDER UL ( C&R) ACT, 1976 | |
|---|---|
| Certain number of sites demanded by te Pune Municipal Corpration/ Pune Housing and Area Development Authority Board are to be reserved for the same purpose Remaining sites are to be deleted and lands to be included in residential zone. | Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers. |

**तसेच सन २०१७ रोजी मान्य विकास नियंत्रण नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

| | |
|---|---|
| Residential ( R) -<br>( a) Public Hosing EWS/LIG Housing | The Planning Authority/Appropriate Authority shall allot such tenement on priority to the persons dispossessed by implementation of Development Plan. |

उपरोक्त नमूद विकास नियंत्रण तरतुदीनुसार हे लक्षात येते की, यापूर्वी सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये -

Pune Municipal Corpration shall use such tenements only for project affected persons/transit camps for slum dwellers.अशी तरतूद होती. मात्र २०१७ मधील विकास नियंत्रण

नियमावली मध्ये केवळ प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिलेले आहे. फक्त त्यांनाच सदनिका द्याव्यात असे बंधन घालण्यात आलेले नाही.

**(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधीलकलम ७९ – नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोगकरणे संबंधी तरतूदी :-**

(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाड्याने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

(ड) जो मोबदला घेवून, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पट्टयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला, असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

**(३) पुणे महानगरपालिका मिळकत/जागावाटप नियमावली मधील भाग ३ मधील कलम ५-**

जागावाटपा संबंधीचे अधिकार – महानगरपालिकेची कोणती ही स्थावर व जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने, किमान चालू बाजारभावाने भाडेपट्टा अथवा विक्री करून देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

**(क) सदनिका विक्री करावयाची आवश्यकता**

**अ)** पुणे मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार या सदनिकांचा वापर पुणे महानगरपालिकेच्या प्रकल्प बाधीत नागरिकांच्या पुनर्वसनाकरीता करणेत येत आहेत. यामधील पुनर्वसन करण्यात आलेले बहुतांश नागरिक झोपडपट्टीधारक आहेत. सदरनागरिकांकडे साधारण रू. ३.६३ कोटी भाड्याची इतकी रक्कम थकबाकी आहे. याबाबत मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तथापि त्यास मिळणारा प्रतिसाद अत्यंत कमीआहे. त्यामुळे सदनिकांचे भाडे वसुल करण्यामध्ये मोठ्याप्रमाणावर प्रशासकीय खर्च होतो. प्रत्यक्षात पुणे महानगरपालिकेला अत्यंत किंमती मालमत्ता विनाकारण सांभाळावी लागते व त्याची देखभाल करावी लागते. त्यावर पुणे मनपाचा खर्च होत असतो.

सदनिका विक्रीचे महानगरपालिकेला होणारे फायदे –

**अ)** मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे असणारा अपुरा सेवकवर्ग तसेच सदनिकाधारकांची भाडे भरण्याबाबत उदासिनता लक्षात घेता या सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** त्या सदनिकेत सध्या राहणाऱ्या पुर्नवसित नागरिकास विक्री केल्यास व त्यासअपेक्षीत प्रतिसाद मिळाल्यास पुणे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसुलीउत्पन्न प्राप्त होईल. याची अंदाजीत महसूल रक्कम रू. ८७.०० कोटी होत आहे.

**ब)**सदर सदनिकांवर पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे.

**क)**सदर सदनिकांची विक्री केल्यानंतर या सदनिकांना करआकारणी केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वार्षिक वाढ होणार आहे.

**(ड) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाचा प्रस्ताव**

भविष्यातील आवश्यकता वा गरज विचारात घेवून पुनर्वसन झालेल्या सदनिका विक्रीबाबत खालीलप्रमाणे महत्वाचे टप्पे राहणार आहेत. **पुणे महानगरपालिकेस २९२३ सदनिका विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये फक्त सदनिका प्राप्त झालेल्या असून सदनिकांखालील जमीन पुणे महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.**

१) पुणे महानगरपालिकेकडे प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन केलेल्या एकूण ३८ इमारती व त्यामधील १२६० सदनिका संपूर्णपणे व्याप्त असल्याने पहिल्या टप्प्यात या इमारतींमधील सदनिका **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करण्यात येणार आहे. याची यादी मा.महापालिकाआयुक्त यांच्यापत्रासोबतच्या परिशिष्ट ब नुसार जोडलीआहे.

२) सदर योजनेला मिळणारा प्रतिसाद विचारात घेवून पुढील टप्प्यात अन्य इमारतींमधील सदनिका याच धोरणानुसार विक्री करण्यात येतील.

३) संपूर्ण इमारतीची विक्री झाल्यानंतर, सदर सदनिकांवरील पुणे महानगरपालिकेचा मालकी हक्क संपुष्टात येवून त्यांचेशी पुणे महानगरपालिकेचा कोणताही संबंध राहणार नाही.

४) विक्रीसाठी प्रस्तावित संपूर्ण इमारतीमधील काही सदनिकाधारकांनी सदनिका खरेदीस नकार दर्शविल्यासअशा सदनिकाधारकांचे अन्य इमारतीमध्ये स्थलांतर करणेत येईल व अशा मोकळ्या सदनिकांमध्ये इतर इमारतीमधील, खरेदीने सदर सदनिका घेऊ ईच्छित असणाऱ्या कुटुंबास स्थलांतरीतकरून संपूर्ण इमारत विक्री योग्य करणेचे अधिकार पुणे महानगरपालिकेस राहतील.

५) सदनिकांची विक्री करताना त्यावरील शासनाच्यादरानुसार होणारी स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. सदनिकाधारकास भरावी लागेल.

६) सदनिका विक्री करीता **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** हा आधारभूत दर म्हणून ग्राह्य धरून सदनिकांची किंमत प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

७) सदर सदनिका कुटुंबातील पतीपत्नीचे नावे करण्यात येणार आहे.

**(इ) कार्यपद्धती**

१) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिका विक्रीकरीता वर्तमान पत्रामध्ये जाहीर प्रकटन देणे.

२) सदनिकांचे प्रचलित **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** मुल्यांकन निश्चित करणे.

३) सदनिकांच्या **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** निश्चित केलेल्या मुल्यांकनावर स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. निश्चित करणे.

४) पुनर्वसन केलेल्या इमारतीमधील सदनिकाधारकांकडून अर्ज दाखल करून घेणे. अर्जासोबत पुनर्वसना बाबत दिलेले पत्र, अनामत रक्कम पावती, आधारकार्ड, लाईट बील, मतदानकार्ड, रेशनकार्ड व भाडे थकीत नसल्याचा दाखला हे पुरावे जोडून घेणे व सदनिकेच्याकिंमतीच्या १०% रक्कम भरून घेणे.

५) अर्जाची छाननी करणे.

६) पात्र अर्जदारांकडून **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** होणारी सदनिकेची संपूर्ण रक्कम भरून घेवून खरेदीखत सदनिकाधारकांकडून स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी व जी.एस.टी. जमा करून खरेदीखताची नोंदणी करणे.

७) विक्री केलेल्या इमारतीनुसार (एकाइमारतीनुसार) सहकारी गृहनिर्माण सोसायटी स्थापन करून घेणे आवश्यक आहे व त्याची स्टॅम्प ड्युटी संबंधीतांनी भरणे.

८) सोसायटी स्थापन झाल्यानंतर भूखंडाबाबत सोसायटीशी कन्व्हेयन्स डीड करून देणे.

९) विकास नियंत्रण नियमावली सन २०१७ व युनीफाईड डी.सी. रूल मधील तरतूदीनुसार ज्या प्रकरणी प्लॉटसह पुणे महानगरपालिकेस बांधीवक्षेत्र प्राप्त झाले आहे. अशा प्रकरणी सदनिकेची किंमत निश्चित करताना प्लॉटची किंमत चालू रेडीरेकनरनुसार समाविष्ट करणेत येणार आहे.

रिक्त सदनिका पुणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांकरीता प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी राखून ठेवण्यात येतील. तसेच सध्या रिक्त असलेल्या सदनिकांची यादी मा.महापालिका आयुक्त यांच्यापत्रासोबतच्या परिशिष्ट क नुसार जोडली आहे.

१) पुणे महानगरपालिकेच्या दि. ०५/०६/१९९७ रोजी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये झालेल्या सुधारणेमधील अ‍ॅपेंडीक्स आर-७ च्या तरतुदीनुसार जी आरक्षणे जागामालक यांनी विकसीत केली आहेत अशा प्रकरणी पुणे महानगरपालिकेस जे बांधीवक्षेत्र हस्तांतरीत केले आहे व हे क्षेत्र म्हणजेच सदनिका या तरतुदीनुसार प्रकल्प बाधितांना प्राधान्याने वाटप केलेले असल्याने व सदर विस्थापित नागरिक त्या ठिकाणी वास्तव्यास असल्याने (परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या) त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) व (ड) आणि पुणे महानगरपालिका मिळकत/जागावाटप नियमावली मधील भाग ३ कलम ५ नुसार **शिघ्रसिद्धगणक दरामधील बांधकाम दराने + मोकळ्या जमिनीचे भाडे या एकूण रकमेनुसार** विक्री करणेस.

२) थकबाकीदार प्रकल्पबाधितांना थकीत भाडे भरण्यासाठी ३ महिन्यांची मुदत देवून सदर मुदतीत थकीत भाडे न भरल्यास त्यांना सक्तीने निष्कासित करणेस व निष्कासित केल्यानंतर रिक्त होणाऱ्या सदनिका खुल्या बाजारात शिघ्रसिद्धगणक दराने जाहीर निविदा प्रक्रियेद्वारे विक्री करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.**

विषय क्र.११९

संदर्भ- १) मा.अरविंद शिंदे, मा.अजित दरेकर, मा.योगेश ससाणे व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि. १४/६/२०२१ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४५, दि.१५/६/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन-

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने आरोग्य विभागाकडील कर्मचा-यांना एक वेतनवाढ देण्यात यावी असा ठराव पारित केलेला आहे. कोरोनाने माहे मार्च २०२० मध्ये पुणेशहरात प्रवेश केल्यापासून कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजनेंतर्गत पुणे महापालिकेच्या सर्व विभागाकडील अधिकारी / कर्मचारी यांनी जीवाची पर्वा न करता विलगीकरण कक्ष, कोविडकेअर सेंटर, सर्व्हेक्षण व तत्सम कामे पार पाडलेली आहेत. आरोग्य विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी केलेले काम कौतुकास्पदच आहेच. त्याप्रमाणे पुणे महापालिकेतील सर्व विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजनेंतर्गत काम केल्याने त्यांना देखील एक वेतनवाढ देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.१२०

संदर्भ- १) मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. १५/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४५२, दि.२२/६/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे शहराजवळील सिंहगडावर सन २०१७ साली शूरवीर तानाजी मालुसरे यांचे भिंतीशिल्प बसविण्यात आले आहे. सदर कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीमार्फत र.रू.२५ लक्ष इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली होती. याच धर्तीवर स्वराज्यप्राप्तीसाठी केलेल्या संघर्षमयी युध्दात आपले निर्विवाद वर्चस्व गाजविणाऱ्या स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती श्री संभाजी राजे यांचे भव्य शिल्प पुरंदर किल्ल्यावर उभारण्यासाठी मा.स्थायी समिती मार्फत र.रू.०१ कोटी इतकी तरतूद करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

छत्रपती श्री संभाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरूष छत्रपती श्री शिवाजी महाराज व महाराणी सईबाईसाहेब यांचे पुत्र होत. छत्रपती श्री संभाजी महाराज यांचा जन्म पुण्यातील हडपसर पासून२० किलोमीटर अंतरावर असलेल्या पुरंदर किल्ला येथे १४ मे १६५७ रोजी झाला होता. छत्रपती श्री संभाजी महाराज हे शूरवीर तर होतेच पण संस्कृतभाषा निपुणही होते. छत्रपती श्री संभाजी महाराज हे अतिशय प्रजाहितदक्ष होते.छत्रपती शिवाजी महाराजानंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन अनेक मोहिमा त्यांनी यशस्वीपणे राबविल्या. छत्रपती श्री संभाजी महाराज हे असामान्य व्यक्तिमत्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असामान्य शौर्य हे त्यांचे विशेष गुण होते. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी ते छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर आग्रा मोहिमेवर गेले होते. याच वेळी आग्राहून रायगडावर परत येताना संभाजी महाराजांनी केलेल्या बुध्दिचातुर्याच्या अनेक कथा प्रसिध्द आहेत. अशा महापराक्रमी महापुरूषांचे शिल्प पुरंदर किल्ल्यावर म्हणजेच त्यांचे जन्मस्थळी उभारल्यास त्यांचे प्रती ही खरी मानवंदना ठरेल.

विषय क्र.१२१

संदर्भ- १) मा.सौ.माधुरी सहस्त्रबुद्धे-अध्यक्षा महिला व बाल कल्याण समिती यांचे दि.२४/०३/२०२१ चे पत्र
२) मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. ११४ दि. २६/३/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७२, दि.२२/६/२०२१

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे मनपाच्या समाजविकास विभागांतर्गत चालविल्या जाणा-या घरटं प्रकल्पातील सेवकांना किमान वेतन दरपत्रकानुसार मानधन देण्यास तसेच महापालिका चालवित असलेल्या पाळणाघर व ग्रंथालयातील सेवकांनाही किमान वेतन दरपत्रकानुसार मानधन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.१२२

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/२३८ दि.१८/६/२०२१ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७७, दि.२२/६/२०२१

------

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने वैकुंठ स्मशानभुमी मधील पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यान्वीत असणाऱ्या विद्युत दाहिनी, गॅस दाहिनी, वुड पायर यंत्रणा या सर्व यंत्रणेची NEERI (National Environmental Engineering Research Institute), पत्ता:- नेहरु मार्ग, नागपूर ४४००२० या संस्थेमार्फत त्रयस्थ पध्दतीने तपासणी करुन त्यानुसार त्यांचेकडुन सुधारणा अहवाल घेण्यास व त्यापोटी त्यांना र.रु. १६,८७,४००/- पर्यंत बिल अदा करणेस व सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

विषय क्र.१२३

संदर्भ- १) सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील प्राप्त तरतुद
२) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचे दि. १६/६/२०२० रोजीचे पत्र.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/परि.क्र.४/२५६ दि. २२/६/२०२१ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९०, दि.२२/६/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत स्वच्छता व पडीक हद्दीचे झाडण कामासाठी कंत्राटी सेवक नेमणे या कामाचे ठेकेदार मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३)(क) अन्वये

नेमणूक करणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

१) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ३० जून २०२१ पर्यंत काम विना करारनामा करुन घेण्यात येणार आहे.

२) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून दिनांक १ एप्रिल २०२१ ते दिनांक ३० जून २०२१ पर्यंत करण्यात येणाऱ्या कामाचे बिल र.रु. २,५२,५२,६५६/- (अक्षरी दोन कोटी बावन्न लक्ष बावन्न हजार सहाशे छपन्न रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम वजावट न करता अदा करण्यात येणार आहे.

३) मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६७ (३)क अन्वये कामकाज करुन घेण्यात येणार आहे.

तसेच हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालयातील निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कार्यादेश होईपर्यंत मे.नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून त्यांचे प्राप्त झालेल्या दरानुसार काम करण्यात येणार आहे.

**विषय क्र.१२४**

संदर्भ- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/२५७ दि. २२/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९१, दि.२२/६/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३)(क) अन्वये अथर्व नेचर हेल्थ केअर प्रा.लि. या मुळ उत्पादक कंपनीकडून महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.(एम.एन.जी.एल.)कंपनी यांनी दिलेल्या पत्रानुसार १००० स्वच्छता सेवक व आरोग्य सेवक कंत्राटी कामगार यांना र.रू.३३ लक्ष रकमेपर्यंत अथर्व सुवर्णभस्मादी वटी औषध खरेदी करणेस व महाराष्ट्र नॅचरल गॅस लि.(एम.एन.जी.एल.) कंपनी यांचेकडून सीएसआर अंतर्गत प्राप्त झालेला निधी मधुन अथर्व नेचर हेल्थ केअर प्रा.लि.यांचे बिल अदा करणेस व सदर बाब मा.मुख्य सभेच्या मान्यतेस सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.१२५**

संदर्भ- १) मा.सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.१७/०५/२०२१ चे पत्र
२) मा.क्रिडा समिती ठराव क्र. १० दि. ९/६/२०२१
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४९४, दि.२२/६/२०२१

------

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

आमचे प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) याबाबत मी मा.मुख्यसभा माहे मे २०२१ चे कार्यपत्रिकेवरील प्रश्नोत्तरामध्ये प्रश्न उपस्थित केला होता. सदर प्रश्नामध्ये मी सदरील फिटनेस क्लब कोणत्या खाजगी संस्थेस पुणे मनपा समवेत करारनामा करून चालविण्यास देण्यात आलेले आहे का? याबाबतचे लेखी उत्तर संबंधित विभागाकडून आले असता, त्यामध्ये सदरील व्यायाम शाळा कोणत्याही खासगी संस्थेस चालविण्यात दिलेले नाही,असे कळविण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात सध्य:स्थितीमध्ये सदरील व्यायाम शाळेचा ताबा विनाकरारनामा राजकीय व्यक्तीच्या वरदहस्ताने अन्य कोणत्या व्यक्तीकडे असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे सदरील व्यायाम शाळा ही विनाकरारनामा अनधिकृतपणे ताब्यात घेवून पुणे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदरील भाग हा झोपडपट्टीमध्ये असून त्या ठिकाणी कोणताही अनर्थ घडला तर त्यास पुर्णपणे पुणे मनपा प्रशासन जबाबदार असणार आहे.

तरी प्र.क्र.१९ मध्ये लोहियानगर काशेवाडी येथे कै.जनरल अरूणकुमार वैद्य स्टेडियम येथे असलेले लहुजी वस्ताद फिटनेस क्लब (व्यायाम शाळा) पुणे मनपाने सील करून स्वत:च्या ताब्यात घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१२६**

संदर्भ- १) मा.महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/९६४,दि. १५/१/२०२० चे पत्र.
२) मा.शहरसुधारणासमिती ठराव क्र. ३१३ दि. १३/३/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५०८, दि.२९/६/२०२१

**विषय -** अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचे प्लॉट नं.६५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरिता पुणे महानगरपालिकेचा मालकीचा फा.प्लॉट क्र. ६६ मनपा जागेचे हस्तांतरण करणेबाबत.

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्यापत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांचेकडून सार्वजनिक कामासाठी घेतलेले एकूण जागा ६९५५.६२७ चौ.मी. विना

भरपाई दिलेली आहे. या बदल्यात पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा प्लॉट नं.६६ क्षेत्रफळ २६१२.२९ चौ.मी. तेथील असणा–या सर्व झोपडयांसह संपूर्ण जागा झोपडपट्टी पुर्नवसन योजना करणेकरिता अभियांत्रिकी महाविदयालय पुणे ( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) यांचेकडे हस्तांतरण करणेस मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१२७**

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/आरोग्य/२६६ दि.२८/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१२, दि.२९/६/२०२१

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

मा.जिल्हाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे यांनी निर्देशीत केलेल्या किरकोळ व्यापारी/घाऊक व्यापारी यांचेकडून खरेदी केलेली रेमडिसिव्हिर इंजेक्शन करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) (क)अन्वये र.रु. २ कोटी पर्यंत झालेल्या खर्चाच्या बिलाची रक्कम अद ाकरणेत येणार असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.१२८**

संदर्भ– १) मा.अध्यक्ष स्थायी समिती यांनी मा.स्थायी समिती बैठकांमध्ये दिलेल्य ासूचना.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/२७७ दि.२९/६/२०२१ चे पत्र.
३) मा.बाळासाहेब ओसवाल, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.राहूल भंडारे, मा.राजाभाऊ लायगुडे, मा.मच्छिंद्र गायकवाड, मा.श्रीमती अमृता बाबर, मा.महेश वाबळे, मा.सौ.अर्चना पाटील, मा.सौ.उज्ज्वला जंगले, मा.सौ.नंदा लोणकर, मा.बंडू गायकवाड, मा.श्रीमती लता राजगुरु यांची दि. २९/६/२०२१ चीउपसूचना.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२०, दि.२९/६/२०२१

-----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन–

पाणीपुरवठा विभागाकडील उत्पन्नवाढीसाठी खालील धोरणानुसार अभय योजना (Amnesty scheme) राबविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) ही अभय योजना फक्त निवासी व व्यापारी आस्थापनांनी घेतलेल्या अनधिकृत नळजोडांसाठीच लागू राहील.
२) ही योजना फक्त तीन महिन्यांसाठीच लागू राहील.
३) ही योजना फक्त १ जून२०२१ पुर्वी अस्तित्वात असलेल्या अनधिकृत नळजोडांकरीताच लागू राहील. या नंतर घेण्यात आलेल्या सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.
४) योजना जाहीर झाल्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये नागरीकांनी अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्ज दाखल करणाऱ्यांनी म.न.पा.च्या पाणीपुरवठा विभागाच्या संबंधित झोनच्या (स्वारगेट/सावरकरभवन/एसएनडीटी/चतु:श्रृंगी/बंडगार्डन/लष्कर) कार्यकारी अभियंत्यांकडे साध्या कागदावर अर्ज करावयाचा आहे. त्या अर्जामध्ये अभय योजनेसाठी अर्ज दाखल करत असल्याचे नमुद करावयाचे आहे. अर्जामध्ये नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक नमुद करायचा असुन, अर्जासोबत एम.एस.ई.बी. किंवा टेलीफोनचे बिल, आधारकार्डाची प्रत, मालकी हक्काची कागदपत्रे जोडावयाची आहे.
५) अर्ज प्राप्त झाल्यानंतर पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांकडुन जागा पाहणी करण्यात येईल. एकुण अस्तित्वातील टेनामेंट्सच्या अनुषंगाने नियमानुसार अनुज्ञेय असलेले नळजोडच नियमान्वित करण्याकरीता पात्र राहतील. इतर सर्व अनधिकृत नळजोडांवर कारवाई करण्यात येईल.
६) एक इंच व्यासापेक्षाअधिक व्यासाचे नळजोड नियमान्वित करण्यात येणार नाहीत.
७) प्रत्येक नियमित करण्यात येणाऱ्या अनधिकृत नळजोडासाठी त्याच्या व्यासाप्रमाणे खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | अनधिकृत नळजोडाचा व्यास (इंचामध्ये) | दंडासहित नळजोड शुल्क रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| | | निवासी नळजोड | व्यापारी नळजोड |
| १ | १/२ | ४,०००.०० | ८,०००.०० |
| २ | ३/४ | ७,५००.०० | १५,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | १ | १९,५००.०० | ३५,५००.०० |

८) सदरच्या शुल्कानुसारअर्जदाराने संपुर्ण रक्कम भरल्यानंतर पाणीपुरवठा खात्यामार्फत प्रत्येक नियमित केलेल्या नळजोडाला नि:शुल्क पध्दतीनेAMR मीटर बसविण्यात येतील.
नळजोड अधिकृत करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क (दंडासहित) पुणे मनपाकडे जमा केल्यानंतर, यापुर्वी अनधिकृतरित्या घेण्यातआलेले नळजोड नियमित असल्याचे समजण्यात येईल.

९) पाणीपुरवठा अभय योजनेमध्ये चाळ विभाग, अनधिकृत झोपडपट्टी, गावठाण, गुंठेवारीनुसार केलेली घरे यांचाही समावेश करणेस

**विषय क्र.१२९**

संदर्भ- १) मा.सौ.मनिषा कदम व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. २९/६/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५२३, दि.२९/६/२०२१

-----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन-

कात्रज-कोंढवा रोड विकास प्रतिष्ठानही रजिस्टर्ड संस्थाअसून कात्रज परिसरातील नागरिकांसाठी विविध सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा व आरोग्य विषयक उपक्रम संस्थेमार्फत राबविले जातात व त्याचा अनेक गोरगरीब व गरजु नागरिकांना लाभ होतो. या परिसरात पॅथॉलॉजी लॅब, ब्लड बँक, आरोग्य विषयक विविध तपासणी, सिटी स्कॅन, एम.आर.आय. या सुविधांकरीता नागरिकांना खाजगी रुग्णालयात जावे लागते व तेथे मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो.

कात्रज-कोंढवा रोड विकास प्रतिष्ठान ही संस्था सदर आरोग्य सुविधा माफक व सर्वांना परवडतील अशादरात करण्यास तयार असुन त्यासाठी त्यांना जागेची आवश्यकता आहे.

तरी पुणे महानगरपालिकेची कात्रज स.नं. २२, निलया सोसायटी शेजारी पुणे महानगरपालिकेची तीन मजली बहुउद्देशीय इमारतीतील तळमजला विविध आरोग्य विषयक उपक्रम राबविण्यासाठी कात्रज-कोंढवा रोड विकास प्रतिष्ठान या संस्थेस नाममात्रदरात ३० वर्षे कराराने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.विधी समितीचा ठराव

**विषय क्र.१३०**

संदर्भ :- १) मा. श्री. सुनिल कांबळे,आमदार व मा. सौ. मंगला मंत्री यांचे दि. १४/०१/२०२१ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.४०,दि.८/३/२०२१

-----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून-

१) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी ३०१४/प्रक्र ०२/नवी/२२, दिनांक २६/८/२०१४ अन्वये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे सेवा नियम मंजूर करण्यात आले होते.

| अ.क्र. | संवर्ग | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १. | लेखा सेवा श्रेणी १ | नामनिर्देशन | अ. सनदी लेखापाल (CA) किंवा ICWA किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची Mcom (Audit & Accounts) प्रथम श्रेणी<br>ब. MBA (FINANCE) पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणी<br>अनुभवः सरकारी /निम सरकारी/खासगी संस्थेतील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव |
| | | पदोन्नती | अ. वित्तीय व्यवस्थापणातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण<br>ब. महानगरपालिका विभागीय परीक्षा (लेखा)उत्तीर्ण असलेल्या लेखा अधिकारी या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून सेवा जेष्ठतेने |

२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी ३०१९/प्रक्र १०८/नवी/२२, दिनांक ३/८/२०२० व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.पीएमसी २०२०/प्रक्र २१५/नवी/२२, दिनांक ३०/९/२०२० अन्वये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे सेवा नियम सुधारित करण्यात आले होते.

| अ.क्र. | संवर्ग | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १. | लेखा सेवा श्रेणी १ | नामनिर्देशन २५% | अ. सनदी लेखापाल (CA) किंवा ICWA किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची चलेो (Audit & Accounts) प्रथम श्रेणी<br>अनुभवः सरकारी /निम सरकारी/खासगी संस्थेतील कामाचा किमान |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५ वर्षे अनुभव |
| | | पदोन्नती ७५% | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाच्या सरळ सेवेकरिता निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पुणे मनपा सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्या मधून (सीए ला प्राधान्य/ ICWA) निवड प्रक्रियेने पद भरण्यात यावे. |

उपरोक्त अ.क्र.२ अन्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव रद्द करण्यात येऊन अ.क्र.१ मध्ये नमूद केल्या प्रमाणे उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव कायम ठेवनेत येऊन कार्यालय परिपत्रक क्र. अतिमआ (ज)/साप्रवि/आस्था/६२९२, दिनांक १४/१२/२०२० अन्वये सुरु केलेली निवड प्रक्रिया थांबविणेस मान्यता देण्यात येत आहे व याप्रमाणे कार्यवाही करणेकामी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जुलै २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.२२, दि.२१/६/२०२१ चा झाला आहे.)**

<u>**विषय क्र.१३१**</u>

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सा.प्र/२१० दि.०९/०६/२०२१ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.९,दि.२४/६/२०२१

-----

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील 'सहाय्यक आयुक्त 'वर्ग-१ (वेतनश्रेणी रू. १५६००, ते ३९१००, + ग्रेड पे ५४००,) या पदावर 'प्रशासन अधिकारी-वर्ग '२ (वेतनश्रेणी रू. ९३००, ते ३४८००, + ग्रेड पे ४४००,) या पदावरून तदर्थ पदोन्नतीने नेमणूक करणेसाठी तयार करावयाचे निवड यादीसाठी दिनांक ०७/०६/२०२१ रोजी मा.पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली आहे. पदोन्नती समितीने खालील बाबी विचारात घेऊन अहवाल सादर केलेला आहे.

१) **पद मंजूरी –** पुणे महानगरपालिकेच्या सुधारित आकृती बंधास महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्र. पीएमसी ३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ चे शासन निर्णयान्वये मे. राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. उपरोक्त मान्य आकृतीबंधानुसार **'सहाय्यक आयुक्त' वर्ग-१ या संवर्गातील एकूण २२ पदे मंजूर असून, ५०% प्रमाणे पदोन्नतीची एकूण ११** मंजूर पदे आहेत. (उर्वरित २५% नामनिर्देशन आणि २५% प्रतिनियुक्ती)

२) **रोस्टर मंजूरी व आरक्षण –** मे. राज्य शासनाचे नगर विकास विभाग यांचेमार्फत सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई कार्यालय यांचेकडून 'सहाय्यक आयुक्त' वर्ग-१ या पदाचे पदोन्नतीच्या रोस्टरची तपासणी दि. २५/११/२०१६ रोजी झालेली आहे. मंजूर रोस्टर प्रमाणे दि. ३१/०५/२०२१ अखेरची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| **तपशिल** | **अजा** | **अज** | **विजाअ** | **भजब** | **भजक** | **भजड** | **विमाप्र** | **खुला** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **१३%** | **७%** | **३%** | **२.५%** | **३.५%** | **२%** | **२%** | **६७%** | **१००%** |
| मंजूर पदे | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ७ | ११ |
| कार्यरत पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |
| **रिक्त पदे** | **२** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **४** | **८** |

उपरोक्त रोस्टरस्थिती पाहता अजा-२, अज-१, विजाअ-१ व खुला-४ अशा मिळून एकूण ८ रिक्त जागा आहेत.

दिनांक ३१ ची २०२०/१२/रोस्टर स्थितीनुसार, दिनांक ०७ २०२१/०५/च्या शासन पत्रान्वये पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात २००४/०५/ ,यावीतअसे आदेशित केल्याने पदोन्नतीसाठी एकूण ८ रिक्त जागा उपलब्ध होत आहेत.

३) **मे. राज्य शासनाने मंजूर केलेली अर्हता -** महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमसी ३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ अन्वये पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मंजूर करण्यात आलेले आहेत.

त्यामधील तरतुदीनुसार 'सहाय्यक आयुक्त' वर्ग-१ या पदासाठी विहित केलेली अर्हता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणुकीची पद्धत व टक्केवारी** | **नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पद्धती** |
|---|---|---|---|---|
| ५ | प्रशासकीय सेवा श्रेणी१- | सहाय्यक आयुक्त | नामनिर्देशन २५% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती ५०% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रशासन अधिकारी संवर्गातील (विभाग प्रमुख) कर्मचाऱ्यांमधून किमान ०३ वर्षांचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती २५% | शासकीय सेवेतील स्थानिक स्वराज्य संस्था / वर्षांपासून धारण करणारे ०५सेवेतील समकक्ष पद .अधिकारी |

४ (**निवडयादी –** सेवाजेष्ठ्ता यादीमधील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रशासन अधिकारी या पदावरील अधिकारी यांचेमधून किमान ०३ वर्षांचा अनुभव असणाऱ्या व महाराष्ट्र शासन ,सामान्य प्रशासन विभाग , /२०१८बीसीसी : शासन निर्णय क्रमांकप्र २०२१ ,मे ०७दिनांक ,ब-१६/३६६.क्र.चे निर्णयातील तरतुदीनुसार पात्र असलेल्या अधिकारी यांची पुढीलप्रमाणे निवड यादीस मा. पदोन्नती समितीने मान्यता दिली आहे.

त्यानुषंगाने ,प्रशासन अधिकारी या पदाच्या सेवाजेष्ठ्ता यादीतील सेवाजेष्ठतेनुसार 'सहाय्यक आयुक्त' वर्ग-१ या संवर्गातील पदावर तदर्थ पदोन्नती देणेबाबत पुढील अधिकारी यांची मापदोन्नती . समितीने एकमताने शिफारस केली आहे.

**:-निवड यादी-:**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा संवर्ग | पदोन्नतीचा संवर्ग | शैक्षणिक पात्रता | जात वैधता प्रमाणपत्र आहे /नाही. |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्रीरेंगडे राजेंद्र नामदेव . | अज | सेवाज्येष्ठतेने | बी.ए. | आहे. |
| २) | श्रीसुपे ज्ञानदेव कोंडीबा . | अज | सेवाज्येष्ठतेने | बी.कॉम . | आहे. |
| ३( | श्रीखलाटे संदीप भगवान . | खुला | सेवाज्येष्ठतेने | बी.ए. | लागू नाही. |
| ४( | श्रीतारू शाम काशिनाथ . | भजब- | सेवाज्येष्ठतेने | बी.कॉम . | आहे. |

वरील निवड यादीप्रमाणे शिफारस केलेल्या अधिकारी यांची १-वर्ग 'सहाय्यक आयुक्त' या पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा. महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

तरीउपरोक्त ,प्रमाणे पदोन्नती समितीचा अहवाल निदर्शनास आणून निवड यादीवरील उमेदवारांची १-वर्ग 'सहाय्यक आयुक्त' या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर त्वरित अंमलबजावणी व्हावी.

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र.१३२**

**संदर्भ**–१) मा. श्रीनाथ भिमाले यांचेदि.२६/०३/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१८४,दि.२६/३/२०२१

-----

मा. शहर सुधारणा समिती मध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून–

पुणे महानगरपालिकेच्या सन १९८७ च्या डी.पी. प्रस्तावामध्ये शहरामध्ये एच.सी.एम.टी.आर. प्रस्ताव तयार करण्यात आला होता. सदर प्रस्तावामध्ये बाधित असलेल्या इमारतींचा विचार करून काही ठिकाणी एच.सी.एम.टी.आर. मार्ग बदलण्यात आलेला आहे. नविन सुधारित आखणीनुसार स्वारगेट येथील पर्वती सर्व्हे नं.३३अ/२, सिटी स.नं.६६१५, फायनल प्लॉट नं.४९० (पैकी) ही मिळकत एच.सी.एम.टी. आर च्या मार्गामुळे पुर्णपणे बाधित होत असल्यामुळे सदरचा रस्ता उत्तर दिशेकडे सरकवून सातारा रस्त्यास समांतर असा सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे बदलण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे जुलै २०२१ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३५, दि.२१/६/२०२१ चा झाला आहे.)**

**विषय क्र.१३३**

संदर्भ–१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/५७,दि. ०४/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१८,दि.११/६/२०२१

------

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देयक्षेत्र चौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे, बावधन(खुर्द) येथीलस.नं.२०/३ /२ड(पै)(नवा) (जुनास.नं.२०/३/ २/४ (पै)) | १५ मी.डि.पी. रस्ता | सौ.सुनिता रंजन देशपांडे | विरळ वस्ती | ४००.०० चौ.मी | ८९.८३ चौ.मी क्षेत्रX २.०५ = १८४.१५ चौ.मी. | ००५८४० | एप्रिल २०२१ |

**विषय क्र.१३४**

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/५८,दि. ०४/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.१९,दि.११/६/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सि.स.नं.४४२, नाना पेठ,पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.ए.आय.ए. कन्स्ट्रक्शन | सुधारित नियमावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ११४८.२५ चौ.मी.(इमारतीचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र आदा केले पोटी देय ३०% टीडीआर) | ००४६१५ | एप्रिल २०२१ |

**विषय क्र.१३५**

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/५९,दि. ०४/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२०,दि.११/६/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआर सी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे,भवानी पेठ स.नं.५२७ (कासेवाडी) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.सौभाग्यलक्ष्मी डेव्हलपर्स | सुधारित नियमावली दि.१५(१)-५ नुसार झोन नाहीत | ९०६.९५ चौ.मी.(झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील उर्वरित राखीव टिडीआर) | ००४६१४ | एप्रिल २०२१ |

**विषय क्र.१३६**

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/६१,दि. ०६/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२,दि.११/६/२०२१

----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडी आर झोन | मालमत्ता पत्रकानुसार क्षेत्र | टिडीआर देय क्षेत्र चौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोथरूड नवीन स.नं.५९/६०/६१/१अ/प्लॉट नं.७१,(जुना स.नं.५९/१+६०/१+६१/१अ /प्लॉट नं.७१)स.स.क्र. १८०३ | कलम २०५(a) अन्वये ६ मी रस्ता,९ मी रस्ता व अनबिल्डेबल क्षेत्र | शरयु ग्रुप तर्फे भागीदार संदीप बाळासाहेब येवले,गिरिष चंद्रकांत म्हस्के,अनिल वसंत पिसाळ,तुषार देविदास पांडकर | विरळ वस्ती | ५९२.५० चौ.मी | कलम २०५(a) अन्वये ६ मी रस्त्याने बाधित क्षेत्र १४०.८३ चौ.मी.९मी रस्त्याने बाधित क्षेत्र १२५.२७ चौ.मी. व अनबिल्डेबल क्षेत्र ३२६.४० चौ.मी. असे एकूण ५९२.५० चौ.मी X २.०५=१२१४.६२ चौ.मी. | ००५८४३ | एप्रिल २०२१ |

**विषय क्र.१३७**

**संदर्भ–**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/१६०,दि. ३१/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४२,दि.११/६/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे एप्रिल २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | मिळकतीचा तपशील | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | क्षेत्र चौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे नाना पेठ, सि.स.नं.१०३८ (पार्ट) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | मे.गोल्डन कन्स्ट्रक्शन | सुधारीत नियमावली दि.१५ (१)–५ नुसार झोन नाहीत | २२१२.९९ चौ.मी(संपूर्ण बांधकामापैकी इमारत ए च्या जोते पूर्णत्वापोटी देय २५% आरसीसी व वीट बांधकाम पूर्णत्वापोटी ३५% व अंतिम भोगवटा प्रमाणपत्रापोटी ३०% सोसायटी अभिहस्तांतरनापोटीच्या १०%टिडीआर क्षेत्रातील फरक स्वरूपात अदा करण्यासाठी व इमारत बी च्या जोतेपूर्णत्वापोटी २५% आरसीसी व वीट बांधकाम पूर्णत्वापोटी ३५%टि.डीआर | ००४६१६ | एप्रिल २०२१ |

**विषय क्र.१३८**

**संदर्भ–**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ टिडीआर/१६१,दि. ३१/०५/२०२१ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४३,दि.११/६/२०२१

-----

पुणे महानगरपालिकेकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या माहे मार्च २०२१ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर.ची माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | आरक्षणाचा सर्व्हे नंबर | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टिडीआर झोन | ७/१२ नुसार क्षेत्र | टिडीआर देयक्षेत्र चौ.मी | डीआरसी क्र. | डीआरसी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धानोरी स.नं.२५अ /१४ (पैकी) | ३० मी.डी.पी.रोड व अनबिल्डेबल क्षेत्र | मे.एस.एम.पी.रियल्टी एल.एल.पी तर्फे संचालक | विरळ वस्ती | ७००.०० चौ.मी | ६०५.७८ चौ.मी क्षेत्रX २.१५ = १३०२.४२७ चौ.मी | ००५०६० | मार्च २०२१ |

## मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव

**विषय क्र.१३९**

**संदर्भ**–१) मा.सौ.अर्चना तुषार पाटील यांचे दि.१७/६/२०२१ चे पत्र.

२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.२५,दि.२३/६/२०२१

------

कोरोनामुळे दोन्ही पालक गमविलेल्या बालकांच्या सर्वेक्षणासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार जिल्हास्तरीय टास्क फोर्स कार्यन्वित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने दोन्ही पालक गमविलेल्या बालकांच्या घरी प्रशासनामार्फत घरटी सर्वेक्षण कार्यवाही सध्या सुरू आहेत.त्या बालकांना भवितव्यासाठी त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देऊन त्यांचे संरक्षण व संगोपन या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना राज्य शासनाने परिपत्रकानुसार दिलेल्या आहेत.हातावर पोट असणाऱ्या कुटुंबामध्ये दैनंदिन पैसे कमावून आणणारा कर्ता पुरूष गेल्यामुळे उर्वरित कुटुंबाची उपासमार होण्याची वेळ आली आहे.

उपरोक्त कार्यवाही अतिशय उल्लेखनीय असून त्याच धर्तीवर पुणे शहरातील ज्या बालकांनी अथवा ज्या कुटुंबानी त्यांच्या घरातील कर्ता पुरूष गमविला आहे अशा घरातील बालकांना या योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.नांव समितीचे निवेदन

**विषय क्र.१४०**

संदर्भ :- मुख्य सभा ठराव क्र.४, दि.२०/४/२०१७

विषय :- पुणे मनपाच्या हददीतील उद्याने, रस्ते, पुल, चौक इतर सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावाची शिफारस करणे.

------

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा **गुरूवार दिनांक १०/६/२०२१ रोजी दुपारी ०३:२५ (तीन वाजून पंचवीस मिनिटे) वाजता** विशेष समिती सभागृहात भरली होती.त्यामध्ये खालील विषय मान्य करण्यात आलेले असून त्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| वि.क्र | संक्षिप्त सिमा विस्तार | सुचविलेले नांव | निर्णय |
|---|---|---|---|
| ५२ | १) प्र.क्र.४१ कोंढवा बु.स.नं.५६/९ मधील ॲमिनिटी स्पेसमध्ये विकसित करणेत येणाऱ्या वाहनतळास<br>२) वाहनतळाच्या वरच्या मजल्यावरील अभ्यासिकेस. | १) भक्ती वेदांत वाहनतळ<br>२) ह.भ.प.पुंडलिक टिळेकर अभ्यासिका | मान्य |
| ५३ | प्र.क्र.८ मधील औंध बोपोडी स.नं.२४५ बाणेर येथील पुणे मनपाच्या सांस्कृतिक सभागृह व आधुनिक विरंगुळा केंद्र संकुलास. | लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे सांस्कृतिक सभागृह | मान्य |
| ५४ | प्रभाग क्र.३९ जयनाथ ते ज्योती विहार पर्यंतच्या मुख्य रस्त्यास | स्व.इराप्पा अडगळे मार्ग | मान्य |
| ५५ | प्रभाग क्र.३३ व ४२ च्या हद्दीमधील भैरवनाथ मंदिरासमोरील बांधण्यात आलेल्या तालमीस. | धायरीगाव तालीम संघ | मान्य |
| ५६ | प्रभाग क्र.३३अ, मध्ये वडगांव बु. स.नं.५६ आशिर्वाद हॉटेल लेन मते ॲमिनिटी स्पसेच्या जागेवरील इमारतीस. | कै.बबनराव केशवराव मते पाटील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र | मान्य |
| ५७ | प्रभाग क्र.४० कात्रज संतोषनगर परिसरातील पंपिंग स्टेशनला | कै.रामचंद्र तुकाराम कदम (परीट ) | मान्य |
| ५८ | पुणे महानगरपालिकेच्या पद्मावती येथील ग्रंथालयास | वीर लहुजी वस्ताद साळवे ग्रंथालय व वाचनालय | मान्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ५९ | सारसबागेसमोरील सावित्राबाई फुले यांच्या पुतळ्यास पूर्वी साध्वी सावित्राबाई फुले असे नांव दिलेले होते.या नावाऐवजी | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | मान्य |
| ६० | प्रभाग क्र.३७ सुप्पर इंदिरानगर येथे बांधण्यात आलेल्या समाज मंदिराला | पंचशिल समाज मंदिर | मान्य |
| ६१ | प्रभाग क्र.३७ अप्पर इंदिरानगर २७६ विभाग येथे बांधलेल्या समाज मंदिराला. | माता रमाई समाज मंदिर | मान्य |
| ६२ | प्रभाग क्र.३७ अप्पर इंदिरानगर २७६ विभाग येथे बांधलेल्या महिला सबलीकरण हॉलला पहिल्या मजल्यावर असलेल्या हॉलला. | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले | मान्य |

**मा.शिक्षण समितीचा ठराव**

**विषय क्र.१४१**

संदर्भ – १) मा. सौ. मंजुश्री खर्डेकर, अध्यक्षा, शिक्षण समिती व मा. सौ.कालिंदा पुंडे यांचे दि. २२/०४/२०२१ चे पत्र.

२) मा.शिक्षण समिती ठराव क्र.११,दि.१०/६/२०२१

––––

मा. शिक्षण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा.मुख्य सभा ठराव क्र.२२१,दि.८/२/२०२१ अन्वये पुणे महानगरपालिकेमध्ये शिक्षण समिती स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली असून,शिक्षण समितीचे कार्यक्षेत्रही निश्चित करण्यात आले आहे.

मा.मुख्य सभा ठराव क्र.२२३,दिनांक १६/२/२०२१ अन्वये शिक्षण समिती गठित करण्यात आली आहे.

तथापि, शिक्षण समितीचे कार्यक्षेत्र निश्चित करताना फक्त शिक्षण विभाग (प्राथमिक) शिक्षण समितीच्या नियंत्रणाखाली देण्यात आला असून,माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग हा अद्यापही महिला व बाल कल्याण समितीकडे सुपूर्त आहे.

पुणे महानगरपालिकेच्या बहुसंख्य शाळा या इयत्ता १ ली ते ८ वी, ५ वी ते १० वी, ५ वी ते १२ वी अशा कार्यरत असून, शैक्षणिकदृष्ट्या निर्णय घेणेकामी सुसूत्रता येणेसाठी माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग हा शिक्षण समितीच्या अधिपत्याखाली घेण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र.१४२**

संदर्भ – मा.सौ.रूपाली धाडवे व मा.सम्राट थोरात यांची सूचना दि.१५/६/२०२१

१) मा.सौ.रुपाली धाडवे व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.१०/२/२०२० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. २२५६ दि. १७/२/२०२०

३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११० दि. ३/६/२०२० ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळा ओसवाल यांची दि.९/६/२०२० ची उपसूचना.

५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२५,दि.९/६/२०२०

६) मनपा ठराव क्र.११२, दि.२१/१२/२०२०

७) मा.आबा बागुल व मा.पृथ्वीराज सुतार यांची दि.१७/२/२०२१ ची उपसूचना.

८) मा.सौ.रूपाली धाडवे व मा.सौ.मानसी देशपांडे यांची दि.१७/२/२०२१ ची उपसूचना.

––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेच्या बिबवेवाडी/धनकवडी पुनर्वसन योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या निवासी व बिगर निवासी गाळयांच्या खालीलप्रमाणे धोरणास मान्यता देण्यात येत आहे.

१) **सदर गाळ्यांच्या भूईभाडयाबाबत –** सदयस्थितीत सदर गाळयांचे भूईभाडे दरमहा र.रू.५ प्रमाणे आकारण्यात येत होते .त्यात आजतागायत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

**उपाययोजना–** दरमहा गाळ्यांचे भाडे मिळकत वाटप नियमावली २००८ नूसार चालू बाजारभावाप्रमाणे होणारे भाडे आकारणेस,

२) **जागा हस्तांतरण शुल्क वाढीबाबत–** यापूर्वी निवासी गाळयांकरिता र.रू.१५,०००/– व व्यावसायिक गाळ्यांसाठी र.रू३०,०००/–फी आकारण्यात येत होती.

**उपाय योजना –** पुणे महानगरपालिकेने ९९ वर्षाच्या भाडेपट्टा कराराने दिलेल्या गाळयांची विक्री पुणे मनपाच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. अशी अट आहे. मात्र सदयास्थितीत पुणे शहरातील जागांचे वाढलेले दर विचारात घेता सदर मिळकतीचे कोणत्याही प्रकारचे हक्क अन्य व्यक्तीच्या नावे बदलून हस्तांतरण करणेस झाल्यास त्यासाठी निवासी गाळयासाठी र.रू. ७५ हजार व व्यावसायिक गाळयांसाठी र.रू.१.५० लाख तसेच कुटूंबातील कुटूंबात(रक्तनाते) हस्तांतरण करणेसाठी र.रू.१०००/– फी आकारण्यात यावी. तथापि सदर हस्तांतरण हे फक्त नियमानूसार अधिकृत बांधकाम क्षेत्रापुरतेच मर्यादित राहील.

३) **सदर जागेवरील कर्जाबाबत–** सदर गाळेधारकांकडून जागा विकसनाची विविध बँकेकडून अर्थसहाय्य मिळणेकरिता या कार्यालयाकडील ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करणेत येत असते.

**उपाययोजना–** सदर पूनर्वसन योजनेची जागा पुणे महानगरपालिकेच्या मालकीची असल्याने तसेच संबंधित गाळाधारक हे भाडेकरू असल्याने मुख्य विधी विभागाकडील अभिप्रायानुसार मनपाच्या जागेवर कोणताही आर्थिक बोजा निर्माण न करणेकरिता संबंधितांना मनपा जागेच्या बदल्यात कोणतेही कर्ज प्रकरणे घेणेकरिता ना हरकत पत्र देणेस,

४) **अनाधिकृत बांधकामाबाबत–** सदर गाळयांचे वाटप करताना संबंधितांना एक एफएस आय पर्यंत बांधकाम करणेस परवानगी देणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानूसार संबंधितांनी रितसर बांधकाम विभागाकडील परवानगी घेवून बांधकाम करणे बंधनकारक होते.–

**उपाययोजना–** अनाधिकृत बांधकामाबाबत नियमानूसार जे बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होऊ शकणार आहे अशा बांधकाम क्षेत्राबाबत रीतसर तडजोड फी आकारून सदर क्षेत्र नियामान्वित करणे. जागेवर झालेल्या अनाधिकृत बांधकाम/ओटयांचा विचार करता शुन्य दर्शनी अंतराची सवलत देता येणार नाही तसेच साईड मार्जिन्स सवलतीं बाबत पुणे महानगरपालिकेकडून निर्णय घेणे योग्य होईल.तसेच सदर ठिकाणी झालेल्या अनधिकृत बांधकामासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे बाबतचे. धोरण मा.मुख्य सभेच्या मान्यतेने शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस,

५) **न झालेल्या करारनाम्याबाबत–** या योजनेमध्ये अदयाप ही काही मिळकती बाबत रितसर कारारनामे करण्यात आलेले नाहीत. सदरचे करारनामे नविन दराने करून घेतल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.

**उपाययोजना–** पुणे मनपा यांचेतर्फे महापालिका सहा.आयुक्त, झोनिपु, बिबवेवाडी धनकवडी परिमंडळ क्र.४ यांचेमार्फत करणे व रस्तारूंदी तत्सम विकास योजनेमध्ये बाधित झालेल्यांचे करारनामे मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत करणेस,

६) **मिळकतकराबाबत–** संबंधितांकडून मूळ गाळयांबाबत अनुज्ञेय व वाढीव बांधकाम क्षेत्रापर्यंत प्रचलित धोरणानुसार नियमित पध्दतीने कर आकारणी करणे. उर्वरीत बांधकामास मिळकत कर आकारणी विभागाकडील धोरणानूसार

७) **बेपत्ता/मयत गाळाधारकांबाबत–** मुळ गाळाधारक हयात नसेल अगर बेपत्ता (हस्तांतरण प्रक्रियेकरिता उपलब्ध नाहीत) असेल किंवा इतर वारसांबाबत कौटूंबिक वादामुळे हस्तांतरण प्रक्रिया स्थगित राहणार असेल अशावेळेस मे.न्यायालयाचे अंतिम आदेश ग्राहय धरणे. मान्य होणारी हस्तांतरण फी पुणे मनपाकडे भरल्यानंतर त्यांचेशी संक्षम प्राधिकारी झोनिपु तथा सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र.५ पुणे मनपा यांचेवतीने करार करणेस,

**८) सदर योजनेअंतर्गत हस्तांतरणास परवानगी देताना खात्याने पुणे म.**न.पा.स तोशीस लागणार नाही व सर्वसामान्य जनतेला अडचण होणार नाहीत अशा अटी–शर्ती निश्चित करण्यास.

**संदर्भ क्र.७ च्या उपसूचनेनुसार –**

प्रभाग क्र.३५ मधील चव्हाणनगर व संभाजीनगर महापालिकेच्या मालकीचे गाळे धनकवडी पुनर्वसन योजने अंतर्गत वाटप करण्यात यावे.

**संदर्भ क्र.८ च्या उपसूचनेनुसार –**

१) मुळ फोटोपास धारकांनी घरे यापूर्वीच विकून ताबा हा आताच्या मालकांना दिलेला आहे. परंतु आता घर विकल्यानंतर मुळ फोटो पासधारक त्याच्या मूळ गावी किंवा इतरत्र कोठेतरी निघून गेला आहे. आजमितीस सदर मुळ फोटो पासधारक कोठेही सापडत नाही अथवा त्याचा पत्ता सापडत नाही. अशा घरांचे हस्तांतरण करावे.

२) तसेच ट्रान्सफर फी ही आता ७५०००/- निवासी व १५००००/- व्यावसायिकला झाल्याने मालक दुसरा/तिसरा/चौथा कोणताही असो फक्त एकाचीच हस्तांतर फी भरून घेण्यात यावी.

३) प्रतिज्ञापत्रात पुणे मनपास जबाबदार धरणार नाही. सरकारी / पुणे मनपा अधिकारी व कर्मचारी वर्ग यांना जबाबदार धरणार नाही अथवा तोशीस लागू देणार नाही. मूळ मालक परत आल्यास त्याची सर्वतो जबाबदारी विकणारा व खरेदी करणारा यांची राहिल.

४) सदर मिळकतीचे मालक यांनी कर्ज फेडीची स्वत: हमी घेवून सदर मिळकतीवर कर्ज देण्यास पुणे मनपाची गवनी खात्याची हरकत नाही व सदर कर्जास पुणे मनपा व गवनी खाते जबाबदार राहणार नाही. या अटीवर कर्ज देण्यास ना हरकत दाखला देण्यात यावा.

५) फक्त सदर बेपत्ता / मयत गाळा धारक यांच्या वारसांनी पुणे मनपा गवनी खात्याकडे हस्तांतराबाबत काही तक्रार अर्ज केल्यास अथवा मिळकत हस्तांतर होऊ नये म्हणून अर्ज केल्यास अशा प्रकरणाबाबत संबंधित गाळाधारकाने योग्य त्या कोर्टाचे आदेश घेऊन यावेत व त्यानंतर हस्तांतर फी घेऊन मिळकत हस्तांतर करण्यात यावी.

६) अन्यथा इतर बेपत्ता / मयत गाळाधारकांचे प्रकरणाबाबत घराचे सर्व ते मुळ पेपर तपासून त्यांच्याकडील मागील हस्तांतर प्रक्रियेनुसार करारनामे व कुलमुखत्यारपत्र पाहून, ताबा कोणाकडे आहे ते पाहून,सद्यस्थितीत ताबाधारकाची पुणे मनपाचे नियमाप्रमाणे हस्तांतर फी घेऊन हस्तांतर प्रक्रिया करावी. तसेच मिळकत घेणार व देणार यांचे कायदेशीर प्रतिज्ञापत्र घेऊन जे एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट किंवा नोटरी यांचेकडील प्रतिज्ञापत्र असेल व सदर प्रतिज्ञापत्रात मिळकत घेणार व देणार यांनी हस्तांतराबाबत काही वाद झाल्यास त्याची खर्चासह जबाबदारी त्यांनी स्विकारावी. तसेच पुणे येथील कोणत्याही दै.पेपरमध्ये हस्तांतराबाबत व बेपत्ता / मयत गाळाधारकांबाबत जाहिर नोटीस देण्यात यावी. तसेच नोटीसीची कोणाचीही हरकत न आलेबाबतची एन.ओ.सी.घ्यावी. त्याबाबत पुणे मनपास अथवा गवनि खात्याचे अधिकारी यांस जबाबदार धरले जाणार नाही.

७) वरील सरसकट प्रकरणात न्यायालयात जाणे सर्वसामान्य नागरिकास क्लिष्ट होईल व त्यास कालावधी देखील खूप जाईल. तसेच मूळ फोटोपासधारक हवा अशी अट ठेऊ नये. चालू परिस्थितीत ज्याच्याकडे ताबा असून मुळ कागदपत्रे आहेत अशा व्यक्तीबरोबर पुणे मनपाने भाडेपट्टा करावा.

असा मनपा ठराव क्र.२२९, दिनांक १७/२/२०२१ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.सौ.रुपाली धाडवे व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.१०/२/२०२० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. २२५६ दि. १७/२/२०२०
३) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/११० दि. ३/६/२०२० ने पाठविलेला अभिप्राय
४) मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळा ओसवाल यांची दि.९/६/२०२० ची उपसूचना.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२२५,दि.९/६/२०२०
६) मनपा ठराव क्र.११२, दि.२१/१२/२०२०
७) मा.आबा बागुल व मा.पृथ्वीराज सुतार यांची दि.१७/२/२०२१ ची उपसूचना.
८) मा.सौ.रूपाली धाडवे व मा.सौ.मानसी देशपांडे यांची दि.१७/२/२०२१ ची उपसूचना.

----

मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील मुद्दा क्र.२ मधील नियमानुसार अधिकृत बांधकाम क्षेत्रापुरतेच मर्यादित राहील हे वाक्य वगळण्यात यावे व बांधकाम ज्या परिस्थितीत आहे त्याच परिस्थितीत घरांचे हस्तांतरण करण्यात यावे.

**<u>विषय क्र.१४३</u>**

संदर्भ – मा.गणेश बिडकर, सभागृहनेता व मा.सौ.मानसी देशपांडे यांची सूचना दि.२९/६/२०२१
१) मा.गणेश बिडकर, सभागृहनेता व मा.दिपक पोटे यांचे दि.२२/१२/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.८८८,दि.२२/१२/२०२०

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

प्रभाग क्र. १६ मधील मंगळवार पेठ भिमनगर येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह हे तक्षशिला महिला मंडळ (रजि.नं. मो.हा. ९०३ मंगळवार पेठ, भिमनगर, पुणे ४११०११) यांना स्थानिक भागांमधील नागरिकांकरीता पुणे महानगरपालिकेच्या विविध योजना राबविण्यासाठी नाममात्र भाडे करारावर ३ वर्षांकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.२३८, दिनांक १७/२/२०२१ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.गणेश बिडकर, सभागृह नेता व मा.दिपक पोटे यांचे दि.२२/१२/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.८८८,दि.२२/१२/२०२०

-----

पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभाग व तक्षशिला महिला मंडळ यांच्यासमवेत संयुक्त प्रकल्प अंतर्गत सामाजिक उपक्रम राबविणेकरिता मान्यता देण्यात यावी.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ८/७/२०२१

**शिवाजी दौंडकर**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सूचना –** कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती.